सकाळ
NIE NEWSPAPER IN EDUCATION
पुणे, शुक्रवार, १९ जानेवारी २०२४ ■ पाने १२ किंमत ₹ ६




दोस्तांनो, मकर संक्रांतीचा सण जवळ आला, की तुम्हा मुलांना वेध लागतात ते पतंग उडवण्याचे. तुमच्यासोबत घरातली मोठी माणसंही उत्साहाने पतंग उडवायला घराच्या गच्चीवर येतात. संक्रांतीची चाहूल लागली, की पुढचे काही दिवस निळ्याभोर आकाशात मुक्तपणे विहार करणारे किती तरी पतंग आपल्याला दिसतात. **हव्या त्या आकारात, हव्या त्या रंगात आणि अगदी आपल्याला हव्या त्या किमतीतही रंगीबेरंगी पतंग बाजारात दिसू लागतात. गूळपोळी खात पतंग उडवण्याची ही मजा तुम्हीही मित्रांसोबत लुटली असेल ना?**

# चला, उंच उंच जाऊ...




## पतंग कसा तयार होतो?

पातळ कागद किंवा प्लॅस्टिक आणि बांबूच्या कामट्या वापरून पतंग तयार केला जातो. त्याला दोऱ्याच्या साह्याने आकाशात उडवले जाते.

पतंग उडविताना मांजाची चक्री धरण्यास एक व पतंगाला ढील देण्यास एक अशा दोन व्यक्ती लागतात. पतंगाच्या दोरीला 'मांजा' असं म्हणतात. काचेची अत्यंत बारीक (कापडाने गाळून घेतलेली) पूड आणि शिजवलेला मऊ भात यांत दोरा बुडवून तो वाळवला जातो. त्यामुळे तो कडक, पक्का होतो. बरेली मांजा सर्वांत उत्कृष्ट मानला जातो.

## देश-विदेशांत पतंगबाजी

- महाराष्ट्रात पुणे, मुंबई, नागपूरसारख्या मोठ्या शहरांमध्ये पतंग महोत्सव आयोजित केले जातात. मात्र, भारतातील सर्वांत मोठा महोत्सव अहमदाबाद येथे भरतो. तेथे 'उत्तरायण' या नावाने पतंग महोत्सव भरतो. हा महोत्सव जगभरात प्रसिद्ध आहे. याशिवाय दिल्ली, लखनौ आणि राजस्थानमध्येही मोठे पतंग महोत्सव भरतात.
- चीनमध्ये पतंग उडवण्याची मोठी परंपरा आहे. त्याबरोबरच युरोप, थायलंडसह बऱ्याच देशांमध्ये मोठ्या प्रमाणावर पतंग महोत्सव आयोजित केले जातात.

## पतंग उडवताना सावधान!

- पतंगासाठी खूप धारदार मांजा वापरू नका. यामुळे हाताच्या बोटांना इजा होण्याची शक्यता असते. मांजा गळ्याभोवती अडकल्याने गळ्याला जखम झाल्याच्याही अनेक घटना घडलेल्या आहेत.
- **नायलॉनच्या मांजावर बंदी आहे. हा मांजा अजिबात वापरू नका आणि कोणी वापरत असेल, तर त्यांना त्याचा वापर टाळायला सांगा.**
- **पक्ष्यांचा वावर जास्त असलेल्या ठिकाणी पतंग उडवू नका. उदा. बाग, नदीकाठ. मांजामुळे पक्ष्यांनाही अपाय होतो.**
- **रहदारीच्या ठिकाणी, इतरांना त्रास होईल अशा ठिकाणी पतंग उडवू नका. शक्यतो टेकड्यांवर, गच्चीत, मैदानांत पतंग उडवा.**
- उन्हात पतंग उडवताना डोळ्यांना गॉगल लावा. आकाशात सतत एकटक पाहिल्याने डोळ्यांवर ताण येतो.

## पहिला पतंग

मित्र-मैत्रिणींनो, पहिला पतंग चीनमध्ये उडवला गेला, असा उल्लेख इतिहासाच्या पानांमध्ये आढळतो. त्यामुळे आजही पतंग चीनमध्ये मोठ्या प्रमाणावर उडवले जातात. बेंजामिन फ्रॅन्कलिन या शास्त्रज्ञाने ढगांमध्ये विद्युत ऊर्जा असते, हे पतंगाच्या दोरीला धातूच्या तारा बांधून सिद्ध केले होते, हेही तुम्ही लक्षात ठेवायला हवं!

## विविध उपयोग

- आज आपण केवळ मजा म्हणून पतंग उडवत असलो, तरी पतंगाचे विविध उपयोग आहेत. संदेश पाठवणे, हवामानाचा अभ्यास करणे इथपासून ते माणसांची वाहतूक करण्यासाठीही पतंगाचा उपयोग झालेला आहे.
- पूर्वीच्या काळात युद्धाच्या वेळी टेहळणी करण्यासाठीही पतंगाचा उपयोग झालेला आहे. शत्रुसैन्याला घाबरवण्यासाठी विचित्र आकाराच्या पतंगांचा वापर केला जायचा.
- आजही सामाजिक संदेश पसरवण्यासाठी, घोषणा देण्यासाठी, एखाद्या गोष्टीच्या प्रचारासाठी पतंगाचा वापर केला जातो.



सकाळ
NIE NEWSPAPER IN EDUCATION
जाहिरात देण्यासाठी संपर्क साधा
9881098448
9619926669



## तिळगुळाची गोडी

मला तिळगूळ खायला खूप आवडतं. संक्रांतीच्या काही दिवस आधी घरात तिळगूळ तयार करण्याची लगबग सुरू होते. आई तिळाच्या वड्या, लाडू करते. मी शाळेत त्या वड्या आणि लाडू घेऊन जातो. माझ्या मित्रांना देतो. तेही त्यांच्या घरून तिळगूळ आणतात. बाबा त्यांच्या ऑफिसमध्ये आणि ताई तिच्या कॉलेजलाही तिळगूळ घेऊन जाते. माझी आजी गुळाच्या पोळ्या खूप छान करते. तिच्या हातच्या पोळ्या खाऊन नंतर दुपारी उबदार गोधडीत झोपण्यात मला खूप मजा वाटते.

संक्रांतीच्या दिवशी संध्याकाळी गावातले काका-काकू, त्यांचा मुलगा अमर आणि बाबांच्या ऑफिसातले कदम काका येतात. कदम काका मला दर वर्षी तिळगूळ आणि चॉकलेटही देतात. मी आणि अमर पतंग उडवतो. बाबा आमच्यासाठी मोठा पतंग आणतात. कॉलनीतली इतर मुलंही आमच्यासोबत येतात आणि आम्ही सगळे मिळून खूप धमाल करतो. संक्रांत सण मला खूप आवडतो.

— **विघ्नेश जाधव,** श्रीगोंदा, नगर

## संपत आणि बलभीम

आमच्या घराच्या गॅलरीत दोन कावळे येऊन बसतात. मी त्यांना बलभीम आणि संपत अशी नावे ठेवली आहेत. रोज सकाळी सहा वाजता ते गॅलरीत येतात आणि मोठमोठ्याने काव काव ओरडतात. त्यांचा आवाज ऐकून मला जाग येते. आई म्हणते सकाळ सकाळ त्यांना भूक लागते म्हणून ते येतात.



पण, मला वाटते ते मला झोपेतून उठवायला येतात. मी झोपेतून उठलो की त्यांना चपाती खायला देतो. पूर्वी संपत आणि बलभीम दोघंही मला घाबरायचे. आता मात्र ते माझ्यासमोर बसूनच चपाती खातात. त्यांची चपाती खाऊन झाली की मी त्यांना पाणी ठेवतो. दोघंही पोटभर चपाती खातात, पाणी पितात आणि उडून जातात. नंतर कुठं जातात मला समजत नाही. पण, मी शाळेत बसलेलो असतो तेव्हा तर खिडकीबाहेरच्या झाडावर दोन कावळे येऊन बसलेले असतात. मला वाटतं ते दोघं माझे मित्र संपत आणि बलभीमच असावेत. पण, सगळेच कावळे सारखे दिसतात. त्यामुळे मला त्यांना ओळखता येत नाही. दोघंही दिवसभर कुठंही गेले तरी दुसऱ्या दिवशी सकाळी चपाती खायला येतातच. तेव्हा मी त्यांना हमखास ओळखू शकतो. कारण माझ्या हातातून चपाती खाण्याचं धाडस फक्त संपत आणि बलभीम या दोघांमध्येच आहे.

— **केतन पाटील,** सातारा

## सुगंधाची मजा

माझ्या बाबांना आणि मोठ्या बहिणीला अत्तर खूप आवडतं. त्यामुळे आमच्याकडे खूप विविध प्रकारची अत्तरे आहेत. केवडा, मोगरा, चंदन, केशर अशा विविध प्रकारची अत्तरे घरात आहेत. देवपूजेसाठीही बाबा अत्तर वापरतात. तसंच, सणाच्या दिवशी किंवा लग्नकार्यातही अत्तर लावलं जातं. दिवाळीच्या दिवसांत आई अंघोळीच्या पाण्यात थोडसं अत्तर टाकते, त्यामुळे सुगंधी पाण्याची अंघोळ करायला मजा येते.



फुलांपासून अत्तर तयार केलं जातं, असं बाबा मला सांगतात. मला मोगऱ्याचं अत्तर खूप आवडतं. आमच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांना बऱ्याचदा बाबा भेट म्हणून अत्तर देतात. बाबांच्या एका मित्राचं अत्तराचं दुकान आहे. मला ते दुकान खूप आवडतं. ते काकाही मला खूप वेगवेगळ्या प्रकारची अत्तरं दाखवतात. तेथील काचेच्या बाटल्या बघताना मात्र मला त्या फुटतील का, अशीही भीती वाटत राहते. अत्तराच्या बाटलीला 'कुपी' असं म्हणतात, असंही मी एकदा बाबांकडून ऐकलं आहे. महत्त्वाचं म्हणजे, अत्तर खूप काळजीपूर्वक लावायचं असतं. ते डोळ्यांत जाऊ देऊ नये, ही बाबांची सूचना मी नेहमीच लक्षात ठेवते.

— **नंदिता भावे,** सोलापूर



## मुलींचे शिक्षण

शिक्षण हा मानवी जीवनातील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. ते शिक्षण सर्व जणांना मिळावे म्हणून आपण काटेकोरपणे प्रयत्न केला पाहिजे.

आपण लहानपणापासून एक वाक्य ऐकत आलो आहोत की, मुलगी शिकली, प्रगती झाली. आपण हे वाक्य ऐकत असलो, तरी या सूचनेचे कोणीही पालन करत नाही. आपल्याला असे वाटत असते की, एका मुलाचे शिक्षण झाले म्हणजे प्रगती झाली, पण तसे नसते. रस्त्याच्या बाजूला भीक मागणाऱ्या मुली, वाड्यावर शेतात काम करणाऱ्या मुली, वंचित, आजारी, व्यसनी पालकांसोबतही राहणाऱ्या मुली आहेत. त्यांचे प्रश्न वेगळे आहेत.

आपल्या देशात अजूनही अशी काही ठिकाणे आहेत की, जेथे मुलींना अजूनही शिकवले जात नाही. अजूनही त्या मुलींना आपल्या आयुष्यात अत्याचार सहन करावे लागतात. मुलींकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन अजूनही तसाच आहे. आपण एका मुलीला शिकवले, तर ती स्वतःही शिकते व जगालाही शिकवते.

जुन्या काळात मुलींनी फक्त चूल आणि मूल सांभाळायचे असे म्हटले जायचे. सावित्रीबाई फुले यांनी मुलींच्या शिक्षणाचा मार्ग शोधला. त्यांनी मुलींसाठी भिडे वाड्यात प्रथम शाळा सुरू केली. त्यामुळे मुलींना शिकण्यास खूप मदत झाली. सावित्रीबाई फुले आणि इंदिरा गांधी यांसारख्या खुप महिलांनी सिद्ध करून दाखवले आहे की, स्त्रिया कोणतेही काम करू शकतात. आजच्या काळात आपण पाहत आहोत की, मुली विमान चालवण्यापासून थेट पोलिस दलापर्यंत सर्व कामे करतात. एवढे सगळे करूनही अजूनही समाजातील काही लोकांचा दृष्टिकोन बदलत नाही. मला असे वाटते की, मुलींनी सगळ्या क्षेत्रांत पुढे राहायला पाहिजे.

— **ऐश्वर्या हजारे,** नववी
सोनूबाई सखाराम महाजन शेतकी प्रशाला मांडवगड, नगर



## मी स्वेटर बोलतोय...

**काय दोस्तांनो, कसे आहात? खूप थंडी वाजतेय ना? त्यामुळेच तर तुम्ही मला कपाटातून बाहेर काढलं आहे.** कपाटातून बाहेर आलो की, मला खूप बरं वाटतं. आम्हा स्वेटर्सचा मऊ, उबदार, स्पर्श तुम्हा सगळ्यांना हवाहवासा वाटतो, होय ना?

आम्ही (शाल, स्वेटर) उबदार आणि मऊ कोणामुळे असतो, ते तुम्हाला माहीत आहे का? आपल्या देशातील हिमाचल प्रदेशात मोठ्या प्रमाणात थंडी असते. तिथे मेंढीपालन केले जाते. त्या मेंढ्यांच्या अंगावर मऊ केस असतात. त्या मऊ केसांपासून लोकर बनवली जाते. ही लोकर उबदार असते. यापासून शाल, स्वेटर, हातमोजे, पायमोजे, स्कार्फ, कानटोपी असे अनेक प्रकार तयार केले जातात.

सध्याच्या फॅशनेबल युगात माझी विविध रूपे बाजारात विक्रीला असतात. चित्रपटातील नायक-नायिकांनी मला आधुनिक रूपात परिधान केल्यामुळे आम्ही 'फॅशन' म्हणूनही लोकांना आवडू लागलो. तुम्हा शाळकरी मुलांच्या गणवेशातही माझा समावेश झाला आहे. शाळेने ठरवून दिलेल्या रंगात तुम्ही सगळे सजू लागलात.

व्यावसायिक जगात माझ्या विविध रूपांचे फॅशन शो होत आहेत. त्यामुळे जागतिक बाजारपेठेतही आमची विक्री सुरू झाली आहे. लहान बाळापासून वयोवृद्ध व्यक्तींपर्यंत सगळेच जण आमचा वापर करतात, तेव्हा आम्हाला खूप बरे वाटते. रस्त्यावर राहणारा गरीब असो की, जगातील सर्वांत श्रीमंत व्यक्ती असो, आम्ही सगळ्यांना सारखीच ऊब देतो. थंडीचे दिवस आले की, आमचे आनंदाचे दिवस सुरू होतात. कारण आम्ही सतत तुम्हा सगळ्यांच्या सोबत असतो.

— **अनिकेत दिवाकर खिराटकर,** नववी, लॉयन्स इंग्लिश मीडियम स्कूल, वणी, जि. यवतमाळ





**विशाखा विष्णू आरसुडे,** मॉडर्न माध्यमिक विद्यालय, सातपूर, जि. नाशिक





**अदिती मुरतडक,** सहावी, श्री गणेश इंटरनॅशनल स्कूल, कोऱ्हाळे, नगर





**युवराजसिंह सोलंकी,** आठवी, बन्सीलाल रामनाथ अग्रवाल हिंदी हायस्कूल, पुणे

२) अत्तराच्या काचेच्या बाटलीला काय म्हणतात?

४) जगातील सर्वांत मोठे मासिक जपानमध्ये प्रसिद्ध झाले.



# भावनिक प्रतिसादाचे सामर्थ्य

**मित्र-मैत्रिणींनो, दुःख, आनंद, भीती, आश्चर्य, राग अशा अनेक भावना आपण दिवसभरात वेळोवेळी दाखवत असतो. त्या प्रसंगी जे जे वाटेल ते भावनांच्या मदतीने आपण व्यक्त करत असतो. मात्र सगळ्यांना हे तितक्याच सहजपणे जमतं असं नाही. तुमचा एखादा मित्र त्याचा राग मनातच ठेवत असेल किंवा हसू येत असूनही मोकळेपणाने हसत नसेल, रडू येताना त्याला स्वतःबद्दल कमीपणा वाटत असेल. असं का होतं? कारण आपण आपल्याच भावना व्यक्त करायला कचरतो. बऱ्याच लोकांना त्यात कमीपणा वाटतो. भावनांच्या आहारी न जाता वेळोवेळी त्या व्यक्त केल्या, तर आपण अधिक प्रसन्न राहतो. निराशा येत नाही आणि संवेदनशीलताही वाढते.**

## अतिविचार नको

आपण कोणत्याही प्रकारच्या भावना व्यक्त करण्याआधी अतिविचार करणं टाळायला हवं. अतिविचार केल्याने जे मनापासून वाटतं, ते बाहेर येत नाही आणि मन मोकळं होत नाही. विचार करणं योग्य असलं, तरी अतिविचार त्रासदायक ठरतात. त्यामुळे ज्या गोष्टी अस्तित्वात नाहीत, त्यांच्याबाबतही आपण विचार करत बसतो. त्याने ताण अधिक वाढतो आणि कोंडमारा होतो. असे लोक एकटे पडू लागतात, ते इतरांशी बोलणे टाळतात. त्यांच्या भावना सतत अव्यक्त राहतात. त्यामुळे अतिविचार करू नका.

## भावनांची भीती नको

कोणतीही भावना व्यक्त करायला घाबरू नका. दिलखुलास हसणं, मोकळेपणाने रडणं, राग आल्यास चिडणं हे खूप साहजिक आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या भावनेबद्दल मनात भीती बाळगू नका. न्यूनगंडात राहू नका. जे वाटतं ते कोणाजवळ तरी स्पष्टपणे बोला. भावना व्यक्त न झाल्यास मनावर दडपण येतं. त्यामुळे चुकूनही त्या अवस्थेत जाऊ नका.

## आपल्यासारखे इतर शोधा

आपण जसे आहोत, तशाच प्रकारच्या लोकांमध्ये आपण अधिक रमतो. उदा. तुम्हाला खेळायला आवडत असेल, तर खेळण्याची आवड असलेल्या मुलांमध्येच तुम्ही जास्त रमाल. भावनांच्या बाबतीतही असंच होतं. आपला स्वभाव जसा असतो, तशा स्वभावाचे लोक आपल्याला आवडतात. त्यांच्याशी आपलं जास्त पटतं. त्यामुळे तुमच्यासारखे लोक शोधा आणि त्यांच्यात स्वतःच्या भावना व्यक्त करा.

## मन शांत ठेवा

भावना व्यक्त करणं महत्त्वाचं असलं, तरी मन शांत ठेवणंही तेवढंच महत्त्वाचं आहे. तुमच्यापैकी अनेकांना परीक्षेच्या वेळी दडपण येत असेल किंवा शाळेत शिक्षकांनी रागवल्यावर खूप वाईट वाटत असेल, तर अशा वेळी मन शांत ठेवायला शिका. आई-बाबांशी किंवा घरातील मोठ्या भावंडांशी बोला. तुम्हाला कळत नसलेल्या गोष्टी त्यांच्याकडून समजून घ्या.

**दोस्तांनो, भावना व्यक्त केल्याने नक्की काय होतं? मन शांत होतं का? चित्त एकाग्र होण्यास मदत होते का? अशा प्रश्नांची उत्तरे तुम्हाला हवी असल्यास 'आर युवर इमोशन्स लाइक माइन?' नावाचं पुस्तक आवर्जून वाचा.**

# पुनर्निर्माणाचा शुभारंभ

**मित्र-मैत्रिणींनो, २२ जानेवारी २०२४ रोजी अयोध्येत प्रभू श्रीरामांच्या मूर्तींची प्राणप्रतिष्ठा होणार आहे. प्रचंड मोठ्या संघर्षानंतर हे भव्य-दिव्य राममंदिर पूर्णत्वास जात आहे. मंदिर निर्माण हा शब्द या देशाला नवीन नाही. शिवकाळातही याबाबत अनेक उत्तम उदाहरणे सापडतात. त्या प्रसंगातूनच जनमानसांला लाभलेली प्रेरणा चिरंतन आहे! चला तर, पाहूया शिवकाळातील 'पुनर्निर्माण'!**

■ सौरभ कर्डे



## सप्तकोटेश्वर मंदिर

गोवा राज्य प्रत्येकाला माहीत आहे. सागरी निसर्गसमृद्धीचं लेणं असलेला गोमांतक प्रदेश धार्मिकतेनेही संपन्न आहे. अनेक प्राचीन मंदिरे, देवालये, तीर्थस्थाने गोव्यामध्ये आहेत. अशांपैकीच एक म्हणजे सप्तकोटेश्वर महादेवाचे मंदिर. प्रथमतः बहामनी सुलतानांच्या राजवटीत या प्राचीन व सुंदर मंदिराची तोडफोड झाली. त्यानंतर गोव्यावर पोर्तुगीज राजवट आली, तेव्हा पोर्तुगिजांनी त्या मंदिराचा विध्वंस केला. अनेक वर्ष अशीच गेली अन् एक दिवस छत्रपती शिवाजीराजांनी गोव्यावर स्वारी केली असता त्यांना या देवस्थानाची माहिती समजली. मंदिराची अन् महादेवाची अवस्था बघून राजांनी पुनर्निर्माण करण्याचा निर्णय घेतला. त्यांच्या आदेशाने सप्तकोटेश्वराचे मंदिर पुन्हा बांधण्यात आले. ही घटना एप्रिल १६६८ मध्ये घडली. त्या ठिकाणी शिलालेख कोरला आहे. तो असा की, 'श्रीसप्तकोटीश शके १५९० कलिकाब्दे कार्तिक कृष्ण पंचम्यां सोमे श्रीशिवराज्ञा देवालयस्य प्रारंभः' तत्कालीन राजकिय परिस्थितीचा अभ्यास करता या देशात मराठी राजसत्तेने मंदिर पुनर्निर्माणाचा प्रारंभ केला, त्याचा शुभारंभ हा सप्तकोटेश्वर मंदिराद्वारे झाला आहे.

## कसबा गणपती

आदिलशाही फौजेने बेचिराख केलेल्या पुण्याची उभारणी करताना कसबा गणपतीचा तांदळा (मूर्ती) मिळाली. त्याचा जीर्णोद्धार व स्थापना स्वतः माँसाहेब जिजाऊ व बालशिवबा यांनी केला.

## तिरुवन्नमलाई व समुद्रतीर पेरुमल

महाराज राज्याभिषेकानंतर दक्षिण दिग्विजयाला गेले, तेव्हा तेथे तिरुवन्नमलाई व समेतीपेरुमल या गावांत परकीय आक्रमणात उद्ध्वस्त झालेली दोन मंदिरे त्यांच्या पाहण्यात आली. तेथे मंदिरांच्या जागी उभारलेले अतिक्रमणित बांधकाम त्यांनी पाडले व त्याजागी पुन्हा दोन्ही मंदिरे उभारली. त्यांची नावे विष्णू व शंकर मंदिर अशी आहेत. तमिळनाडू राज्यात महाराजांनी हे पुनर्निर्माण केले. तेथे नंतर मोठा दीपोत्सव केला गेला. 'शिवाजीसमरोत्सवा' असे नाव त्या उत्सवाला आहे. छत्रपती शिवाजी महाराज जाणते होते, नेणते होते. त्यांनी आक्रमकांनी पाडलेल्या मंदिरांचे पुनर्निर्माणदेखील केले.

आम्ही रामाचे राऊत। वीर झुंजार बहुत।। हा संत तुकोबारायांचा अभंग शिवछत्रपतींनी कृतीतून सार्थ ठरवला आहे. देशभरात मंदिर निर्माणाचे वातावरण असताना त्याचा पाया रचणाऱ्या छत्रपतींना मानाचा मुजरा!

*(लेखक शिवव्याख्याते आहेत.)*






**स्किल्स बकेट...**

# मी होणार इव्हेंट मॅनेजर!

मित्रांनो, तुम्ही कधी मोठ्या बर्थडे पार्टीला गेलाय का? किंवा आई-बाबांसोबत एखाद्या जंगी लग्नकार्याला गेला आहात का? तिथली ती सारी भव्यता पाहून भारी वाटले असेल ना? पण, ते सारं भारी भारी नियोजन कुण्या एका माणसानं केलेलं नसतं बरं. 'इव्हेंट मॅनेज' करणारी एक टीम असते, ती हे सारं नियोजन करते. तुम्हाला मोठे झाल्यावर 'इव्हेंट मॅनेजर' व्हायचं असेल तर आत्तापासून तयारी करायला हवी.

## बारावीनंतर पदवी

**घरातल्या छोट्या-छोट्या कार्यक्रमांमधून तुम्ही इव्हेंट मॅनेजमेंटचा अनुभव घेतला तरी तुम्हाला याचे शिक्षण किमान बारावीनंतर घेता येऊ शकते.** तुम्हाला जर कार्यक्रमांचे नियोजन करण्याची आवड निर्माण झाली तर तुम्ही बारावीनंतर इव्हेंट मॅनेजमेंटचा डिप्लोमा करू शकता. ग्रॅज्युएशननंतरही इव्हेंट मॅनेजमेंटची पोस्ट ग्रॅज्युएशन डिग्री घेता येते. याशिवाय बरेच शॉर्ट कोर्सही उपलब्ध आहेत.

## कामाची वाटणी

**समजा आई-बाबांच्या लग्नाचा वाढदिवस असेल, तर आई-बाबा सोडून घरातल्या सर्व सदस्यांना कामे वाटून द्या.** प्रत्येक जण आपापलं काम व्यवस्थित करतो आहे का त्यावर लक्ष ठेवा. आई-बाबांना सरप्राइज पार्टी द्या. यासाठी आजी-आजोबा किंवा काका-काकू यांना मदतीला घ्या. याशिवाय आजोबांचा साठावा वाढदिवस किंवा बाबांना नोकरीत मिळालेले प्रमोशन याचीही पार्टी आयोजित करू शकता.

## वाढदिवसाचे करा नियोजन

**तुमच्या लहान भावाचा किंवा बहिणीचा वाढदिवस असेल तर तुम्ही वाढदिवसाच्या पार्टीचे नियोजन करून इव्हेंट मॅनेजमेंटची तयारी करू शकता.** त्यासाठी सर्वप्रथम वाढदिवसाचे डेकोरेशन काय असावे, कुणाकुणाला बोलवायचे, घरातल्या लोकांनी कसे कपडे घालायचे, जेवण काय असावे, किती असावे, केक कसा असावा अशा सर्व गोष्टींची यादी करा आणि पूर्ण प्लॅनिंग आई-बाबांना दाखवा. त्यांना नक्कीच तुमचं नियोजन आवडेल.



## कार्यक्रमांना हजेरी लावा

वाढदिवसाची पार्टी, घराची पूजा, लग्नकार्य, सामाजिक कार्यक्रम अशा विविध कार्यक्रमांना आवर्जून हजेरी लावा. तिथलं नियोजन कसं आहे, काय कमतरता आहे, काय चांगलं आहे, कुठं पैसे वाचविले, कुठं पैसे उधळले, या सर्व गोष्टींचे बारीक निरीक्षण करा. ते लिहून ठेवा. केवळ निरीक्षणातूनही बराच अभ्यास होतो, जो आपल्याला आपल्या नियोजनात उपयोगी पडतो.

**पैसे वाचवा**

घरामध्ये कोणताही कार्यक्रम असेल तर त्यामध्ये सहभागी होऊन किती खर्च होईल याचा अंदाज काढा. आईबाबांसोबत बाजारात जाऊन वस्तूंच्या किमती तपासा. तुम्ही तो खर्च कसा आटोक्यात आणता येईल, यावर तोडगा काढा. असं केल्यानं तुमचा कमी पैशात चांगला कार्यक्रम कसा करता येईल याचा अभ्यास होईल.

? ३) कार्यक्रमांचे नियोजन करणाऱ्याला काय म्हणतात?

✔ १) इनकम टॅक्सला मराठीत प्राप्तिकर असं म्हणतात.

# विक्रमांची अजब दुनिया

दोस्तहो, विक्रमांची दुनिया अजब आणि अतर्क्य. चला तर, विक्रमांच्या पोतडीत यावेळी काय काय आहे ते बघूया.





## किल्ल्याभोवतीची मोठी भिंत

**दोस्तांनो, किल्ल्याभोवतीच्या भिंतीला तटबंदी म्हणतात हे तर तुम्हाला माहित आहेच.** मात्र, तटबंदीसारखीच बांधलेली एक खूप मोठी भिंत कुंभलगडच्या सभोवती आहे. पायऱ्या चढून वर जाता येईल अशी या भिंतीची रचना आहे. २२.४ मैल एवढ्या मोठ्या लांबीची ही भिंत असून, तिची रुंदी ५ मीटर आहे. या भिंतीला ७ ठिकाणी प्रवेशद्वार असून, ऐतिहासिक उल्लेखांनुसार या भिंतीवरून एक वेळेस ८ घोडे धावत असत. मेवाड आणि मारवाड या दोन भागांचे विभाजन या भिंतीमुळे होते. या किल्ल्याच्या आवारात आणि भिंतीच्या भागातही एकूण ३६० मंदिरांचा समावेश आहे. जगभरातून अनेक पर्यटक कुंभलगड आणि त्याची विशाल भिंत पाहण्यासाठी येत असतात.



## हजारो नाण्यांचा संग्राहक


**मित्र-मैत्रिणींनो, नाण्यांचा संग्रह करणं तुम्हाला आवडत असेल किंवा तुमच्या ओळखीतही कोणी तरी नाण्यांचा संग्रह केला असेल.** विविध पद्धतीची नाणी गोळा करणं अनेकांना आवडतं. मात्र, आपण जी नाणी गोळा करतो, ती कोणत्या तरी एकाच धातूने तयार केलेली असतात. जसे की, लोह, तांबे, पितळ, चांदी, सोने इत्यादी. परंतु, एकाहून अधिक धातूंनी तयार केलेली नाणी फारशी पाहण्यात येत नाहीत. अशा २,६०२ नाण्यांचा संग्रह उत्तर प्रदेशमधील मनीष धमेजा यांनी केला आहे. ऑक्टोबर २०१६ मध्ये त्यांच्याकडे २,६०२ नाणी होती. आता त्यात कित्येक नाण्यांची भरही पडली असेल. तुम्हीदेखील अशा काही वेगळ्या नाण्यांचा संग्रह करायला हरकत नाही.

## टेबल टेनिस शिकवणारा रोबोट

**हल्लीच्या काळात रोबोट कोणतेही काम करू शकतो, हे तुम्हाला माहीत असेलच.** अमेरिकेसारख्या देशात काही हॉटेल्समध्ये रोबोट वेटरचं कामही करतात. मात्र, टेबल टेनिससारखा खेळही रोबोट शिकवू शकतो, हे २०१५ मध्ये सिद्ध झाले. जपानच्या ऑमरॉन कॉर्पोरेशन या कंपनीने हा रोबोट तयार केला आहे. टेबल टेनिसच्या टेबलवर लावलेल्या सेन्सर्समुळे एका सेकंदात तो ८० विविध पद्धतीने समोरून येणारा चेंडू ओळखू शकतो. त्यानुसार तो त्या चेंडूला पुन्हा त्या खेळाडूच्या दिशेने टोलवू शकतो. प्रतिस्पर्ध्याने वाईट पद्धतीने खेळलेला चेंडूदेखील रोबोटला सहजपणे टोलवता यावा हे उद्दिष्ट ठेवून हा रोबोट तयार करण्यात आला आहे. याचाच अर्थ हा की, जी गोष्ट शिकायला मानवाला सातत्याने सराव करावा लागतो, तीच गोष्ट हा रोबोट थोड्याच कालावधीत शिकवणार आहे.





## सर्वांत मोठे कॉमिक्स



तुम्हा सर्वांनाच कॉमिक्स वाचायला आवडतं. मात्र, जगातलं सर्वांत मोठं कॉमिक्स कधी व कुठे प्रकाशित झालंय, हे तुम्हाला माहित आहे का? सुमारे ७,०३० चौरस सेंटिमीटर एवढ्या मोठ्या आकारचे हे कॉमिक्स जपानमधील कोदान्शा कंपनीने प्रकाशित केले. 'अटॅक ऑन टायटन' असे या कॉमिक्सचे नाव असून, त्याचे लेखन हाजिमे इसायामा यांनी केले आहे. यातील चित्रेदेखील त्यांनीच रेखाटली आहेत. या कॉमिक्सचे पुढे पुस्तकरूपातही प्रकाशन करण्यात आले. २०२१ मध्ये हा विश्वविक्रम करण्यात आला होता. जगभरातील सर्वांत मोठे कॉमिक्स पाहण्यासाठी येथे खूप पर्यटक येत असतात. त्यामुळे त्याचे उत्तम प्रकारे जतन करण्यात आले आहे. छोट्या आकारातील गोष्टींची पुस्तके वाचण्याची सवय असलेल्या मुलांना एवढे मोठे कॉमिक्स पाहून हरखून जायला होते. त्यामुळे मुलांची गर्दी जास्त असते.

स्क्रीन टाइम

फाइंडिंग निमो



### कशासाठी बघायचा चित्रपट?

- एकजूट झाली तर आपण कोणताही प्रश्न सहज सोडवू शकतो, याची शिकवण या चित्रपटातून मिळते.
- प्रत्येक मुलामध्ये वेगळी गुणवत्ता असते हे चित्रपट पाहताना प्रकर्षाने जाणवते.

# धमाल मनोरंजनाची 'चिल्लर पार्टी'




**काही चित्रपट असे असतात जे आपल्याला खळखळून हसवतात आणि हसवता हसवता मोठा संदेशही देऊन जातात. 'चिल्लर पार्टी' हा असाच एक चित्रपट.**

मुलांनी ठरवले तर ते एखाद्या राजकारण्यालाही शह देऊ शकतात, हे या चित्रपटात पाहायला मिळते. सहजसोपे गमतीदार संवाद आणि लहान मुलांचा सुंदर अभिनय यांमुळे प्रत्येक मुलाला हा चित्रपट आपलासा वाटतो.

### चित्रपटाची गोष्ट

**मुंबईत एक सोसायटी असते. तिथे अनेक कुटुंबं आणि लहान मुलं राहत असतात.** त्या सोसायटीमध्ये एक गाडी धुणारा मुलगा येऊन राहू लागतो. त्याचं नाव असतं फटका. सुरुवातीला फटकाचं आणि सोसायटीतल्या मुलांचे पटत नाही. पण, फटका वेगवान गोलंदाज असल्याचं सोसायटीच्या मुलांना समजतं आणि ते त्याला सोसायटीच्या क्रिकेट टीममध्ये घेतात. फटकामुळे सोसायटीची क्रिकेट टीम जिंकते आणि सर्व जण फटकाचे मित्र होतात. फटकासोबत त्याचा एक कुत्रा असतो. त्याचं नाव असतं भिडू असतो. सर्वजण भिडूचेही मित्र होतात. एक दिवस सोसायटीच्या गार्डनचे उद्‌घाटन करण्यासाठी मंत्री शशिकांत भिडे येतात. त्या वेळी भिडू हा कुत्रा शशिकांत भिडे यांच्या सहाय्यकावर हल्ला करतो. मुळात भिडूची काहीच चुक नसते. पण ही बातमी होते आणि शशिकांत भिडे त्या कुत्र्याला सोसायटीतून हाकलण्यास सांगतात. पण भिडू तर सर्व मुलांचा चांगला मित्र असतो. आता ही सर्व मुलं मिळून भिडूला वाचवतात का? शशिकांत भिडे एवढा मोठा मंत्री असतो मग तो काय काय करतो? मुलांचे पालक मुलांना मदत करतात का ? अशा सर्व प्रश्नांच्या उत्तरांसाठी हा चित्रपट नक्कीच पाहायला हवा.

### चित्रपटाचे वैशिष्ट्य

**हा चित्रपट लहान मुलांचा असला तरी सहकुटुंब पाहिल्याने पालक आणि मुलांमधला सुसंवाद आणखी वाढू शकतो. पालक म्हणून आपण कुठं चुकतो याची जाणही हा चित्रपट पाहताना होते.**

माय रेसिपी

मित्रांनो, तुम्हाला मैदानी खेळ आवडत असतील किंवा तुम्ही कोणत्यातरी खेळात सहभागी असाल तर तुम्हाला जास्त ऊर्जेची गरज पडते. अशा वेळी मटकी मॅजिक या तुम्हाला ताकद देणारा सर्वोत्तम खाद्यपदार्थ आहे. मटकी मॅजिकची रेसिपी समजून घ्या, पोटभर खा आणि पोटभर खेळा.

### प्रयोग करा

मटकी मॅजिकची लज्जत व पौष्टिकता अधिक वाढविण्यासाठी वरून कच्चा कांदा, टोमॅटो व डाळिंबाचे दाणे टाकावेत. यामुळे पदार्थही आकर्षक दिसतो आणि चवही छान लागते.

## मटकी मॅजिक

**साहित्य -**
दीड वाटी मोडाची मटकी, पाव वाटी मक्याचे दाणे, पाव वाटी भिजवलेले शेंगदाणे, अगदी थोडे तेल, आलं-लसूण-मिरची पेस्ट, लिंबू रस किंवा आमचूर पावडर, जिरे, हिंग, हळद, मीठ आवश्यकतेनुसार, कोथिंबीर.

**कृती -**
सगळ्यात आधी फोडणीपुरतेच तेल घेऊन त्यात जिरे, हळद, हिंग व आलं- लसूण पेस्ट घालावी. त्यानंतर मटकी, मका, शेंगदाणे घालून पाणी न घालता मंद आचेवर हे मिश्रण वाफेवर शिजवावे. मिश्रण शिजल्यावर त्यात मीठ आणि कोथिंबीर घालावी. बस्स... आपली मटकी मॅजिक तयार. हा खाऊ खाण्यापूर्वी त्यावर लिंबाचा रस किंवा आमचूर पावडर घाला. चमच्याने ते मिश्रण हलवून एकजीव करा आणि त्यानंतर चमचमीत मटकी मॅजिकचा आस्वाद घ्या.

**कोणास फायद्याचे -**
मटकी मॅजिक या खाऊमधून प्रथिने व फायबर भरपूर मिळते. त्यामुळे तुम्हाला अंगावरची चरबी कमी करायची असेल तर हा उत्तम खाऊ आहे. व्यायाम करणाऱ्या किंवा मैदानी खेळ खेळणाऱ्या मुलांना या खाऊतून उत्तम हायप्रोटीन मिळते. क्रीडापटूंसाठी पोस्ट वर्कआऊट फूड म्हणून हा पदार्थ चांगला आहे. मात्र तब्येतीने बारीक असलेल्या मुलांनी यात चमचाभर लोणी टाकून घ्यावे.

**काय काळजी घ्यावी ?**
मटकी मॅजिक करताना फोडणी द्यावयाची असते. त्यामुळे गॅस लावताना आई-बाबा सोबत असलेच पाहिजेत. आलं, लसूण, मिरचीचे प्रमाण चुकले तर खाऊची चव बिघडू शकते, त्यामुळं त्यांच्या मार्गदर्शनाखालीच ही रेसिपी बनवावी.



? ४) जगातील सर्वांत मोठे मासिक कुठे प्रसिद्ध झाले?

✓ ७) गणिते सोडवण्यासाठी मायक्रोसॉफ्टने कोणते ॲप तयार केले.

अवतीभवती

चित्रामध्ये, मोबाईलवर किंवा टीव्हीवर आपण शहामृग बरेचदा पाहिलेला असतो. 'षटकोनाचा ष' आणि 'शहामृगाचा श' असंही आपण शाळेत शिकलेलो असतो. पण, हे शहामृग नेमका असतो कसा? खातो काय? राहतो कसा? याविषयी आपल्याला फारशी माहिती नसते. चला तर मग, आज आपण जाणून घेऊ जगातल्या सर्वात मोठ्या पक्ष्याची, म्हणजेच शहामृगाची गमतीशीर माहिती.

# जगातील सर्वांत मोठा पक्षी शहामृग




## आम्हाला दातच नाहीत

**शहामृग काहीही खातात. म्हणजे हे पक्षी सर्वभक्षक आहेत. गवत, फळे, वनस्पतींची पाने, वनस्पतींची मुळे, धान्य हे व्हेज पदार्थतर शहामृग खातातच.** पण, त्यांना भूक लागली आणि समोर बेडूक, सरडा किंवा सरपटणारे छोटे प्राणी दिसले तर शहामृग ते प्राणीही खातो. मला हेच खायचं, मला तेच खायचं असे त्यांचे नखरे अजिबात नसतात. समोर येईल ते शहामृग आनंदाने खातात. पण, शहामृगाला दात नसतात बरं का. ते सगळा खाऊ थेट गिळतात आणि नंतर पचवतात.

## दोन किलोमीटरपर्यंतची नजर

**शहामृगाची नजर प्रचंड तीक्ष्ण असते. दोन किलोमीटर अंतरावरचेही त्यांना व्यवस्थित दिसू शकते.** सिंह, बिबट्या, शिकारी कुत्रा किंवा चित्ता हे प्राणी जंगलातल्या शहामृगांवर हल्ला करतात. हे प्राणी दोन किलोमीटर लांब असतात, तेव्हाच शहामृग त्यांना पाहतात आणि तिथून पळून जातात. शहामृग जेवणामधूनच पाणी शोषून घेतात, त्यामुळे बरेच दिवस पाणी न पिताही ते राहू शकतात.

## माणसाएवढा उंच

**आपण आपल्या अवतीभवती पाहतो ते पक्षी किती छोटे छोटे असतात ना?** चिमणी, सुगरण, बहिरा पोपट हे पक्षी आपण एका हातात पकडू शकतो. कावळा, पोपट, कबूतर हे पक्षी दोन्ही हातांनी पकडता येऊ शकतात. त्याहून मोठे पक्षी म्हणजे घार किंवा बगळा. पण, या सगळ्यांहून मोठा पक्षी म्हणजे शहामृग. ज्याची उंची असते पाच फूट. तुमच्या घरामध्ये कुणी पाच फूट उंचीची व्यक्ती असेल तर विचार करा त्या व्यक्तीएवढा उंच शहामृग असतो. आता एवढा मोठा शहामृग तुमच्यासमोर उभा राहिला तर तुम्ही केवढे दिसाल?



- वजनामुळे आणि आकारामुळे शहामृग हा पक्षी उडू शकत नाही.
- सर्वांत शक्तिशाली पक्षी म्हणूनही शहामृग ओळखला जातो.
- शहामृग आफ्रिकेच्या वाळवंटी परिसरात आढळतात.
- जंगलामध्ये शहामृगाचे आयुष्य ३० ते ४० वर्षे असते.
- शहामृगाचे डोळे पाच सेंटिमीटर एवढे मोठे असतात.
- शहामृगाचे पंख सहा फुटांपर्यंत विस्तारतात.

## अस्वलाएवढे वजन

**अस्वल किती मोठे असते तुम्हाला माहिती असेलच. त्या अस्वलाचं जेवढं वजन असतं तेवढं वजन शहामृगाचं असतं.** नवल वाटले ना? पण, हे खरे आहे. मोठ्या शहामृगाचे वजन १३० किलो एवढे असू शकते. आता तुम्ही तुमचे वजन किती आहे ते पाहा आणि तुमच्यापेक्षा शहामृग किती वजनदार आहे त्याचा विचार करा.

## सिंहसुद्धा घाबरतो

**प्रत्येक पक्ष्याकडे स्वतःची एक वेगळी ताकद असते.** त्या ताकदीच्या जिवावर तो कोणत्याही प्राण्याच्या तावडीतून स्वतःचा जीव वाचवू शकतो. शहामृगाचे पाय ही त्याची सर्वांत मोठी ताकद आहे. शहामृगाच्या पायांची भीती सिंहालाही वाटते बरं का! सिंहाने शहामृगावर हल्ला केला आणि शहामृगाची लाथ सिंहाला बसली तर सिंहाचा जीवसुद्धा जाऊ शकतो.

## ताशी ७० किलोमीटर

**शहामृग वजनाने जास्त असल्याने ते उडू शकत नाही. पण, धावतात मात्र वेगाने बरं का.** तासाला सत्तर किलोमीटर या वेगाने शहामृग धावू शकतो. शहामृगाच्या शरीराची रचना इतर पक्ष्यांपेक्षा वेगळी असते. त्यांची मान लांब असते, चोच आखूड असते, तर पाय लांब आणि एकदम मजबूत असतात. या लांब पायामुळेच शहामृग प्रचंड उंच दिसतात.



## कोंबड्याच्या वजनाएवढे अंडे

**शहामृगाचे अंडे हे खूप मोठे असते, ते सहजासहजी फुटत नाही.** अंड्यांचं कवच इतकं कठीण असते, की एखादा माणूस त्या अंड्यावर बसला तरीही ते फुटत नाही. अंड्याचा आकार १५ सेंटिमीटर एवढा असतो, तर त्याचं वजन चक्क कोंबड्याच्या वजनाएवढे म्हणजे दोन किलोपर्यंत असू शकतं.

# मकर संक्रांतीचं वैज्ञानिक महत्त्व काय?



**आपण सर्वांनी नुकतीच मकर संक्रांत साजरी केली. संक्रांत म्हणजे भरपूर तिळगूळ खाण्याचा सण, हो ना?** तुम्हाला या संक्रांतीचं वैज्ञानिक महत्त्व माहीत आहे का? संक्रांत हा शब्द संक्रमण या शब्दावरून आला आहे.

खगोलशास्त्रानुसार संक्रमण या शब्दाचा अर्थ एका राशीतून दुसऱ्या राशीत जाणे. मकर संक्रांत म्हणजे सूर्याचा मकर राशीत प्रवेशाचा पहिला दिवस. खरं तर, सूर्य दर महिन्यात एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करत असतो. म्हणजेच, दर महिन्यात त्या त्या राशीची संक्रांत होत असते, पण तरी त्याचे मकर राशीतले संक्रमण साजरे केले जाते. कारण, फार पूर्वी सूर्य मकर संक्रांतीच्या दिवशीच मकरवृत्तावर असे आणि तेव्हापासून सूर्याच्या उत्तरायणाला प्रारंभ होत असे.

आता साधारणतः २२ डिसेंबरपासून उत्तरायण सुरू होते. उत्तरायण सुरू झाले की, दिवस हळूहळू मोठा होऊ लागतो म्हणजेच सूर्यापासून प्रकाश व उष्णतारूपात ऊर्जा मिळण्याचा कालावधी वाढत जातो. याचाच अर्थ हा की, ऊन वाढत जाते आणि थंडी कमी होत जाते. त्यामुळेच संक्रांत झाल्यावर थंडी जाते, असं आपल्याला सांगितलं जातं. या निमित्ताने ऊर्जेचा स्रोत असलेल्या सूर्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली जाते, तर मग संक्रांतीला एकमेकांना 'तिळगूळ घ्या, गोड आणि वैज्ञानिक बोला', असे सांगायला हरकत नाही. हो ना ?

असं का?...

डॉ. दीप्ती सिधये

# फ्लेमिंगो भिगवणला कसे येतात?



**दोस्तांनो, मागील भागात आपण फ्लेमिंगोसारखे पक्षी भिगवणसारख्या ठिकाणी स्थलांतर का करतात, हे बघितलं.** मग तुमच्यापैकी काही जणांना वाटलं असेल, की मुळात ते स्थलांतर करतात तरी कसं? त्यांच्याकडे गुगल मॅप वगैरे काहीही नसतं! तर, अशी शंका येणं साहजिकच आहे. मात्र, पूर्वी म्हणजे इंटरनेट नसतानाही लोक पत्ता शोधून खाणा-खुणांच्या मदतीने तो लक्षात ठेवत होतेच ना.

अगदी त्याच पद्धतीने कुठलाही नकाशा किंवा ॲप नसतानाही फ्लेमिंगोसारखे पक्षी हजारो किलोमीटरचा प्रवास करून भिगवणसारख्या ठिकाणी बरोबर पोहोचतात. या प्रवासासाठी पक्षी सूर्य, इतर तारे यांसारख्या खगोलीय संकेतांचा वापर करतात. असे संकेत दिवसभर, सर्व ऋतूंमध्ये आणि उत्तर ते दक्षिण गोलार्धात विशिष्ट पद्धतीने बदलत असतात. त्याचप्रमाणे स्थान आणि दिशा निर्धारित करण्यासाठी ते पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राचाही उपयोग करतात.

पृथ्वीचे चुंबकत्व ध्रुवावर सर्वांत जास्त आहे आणि विषुववृत्ताकडे उत्तरोत्तर कमी होत गेले आहे. पक्षी पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्राच्या सामर्थ्यातील फरक ओळखून उत्तर-दक्षिण दिशा ओळखू शकतात. अलीकडेच अभ्यासकांनी स्थलांतरित पक्ष्यांच्या मेंदूचा असा एक भाग ओळखला आहे जो चुंबकत्व शोधू शकतो. त्यामुळे हा प्रवास करणे पक्ष्यांना शक्य होते.

? ५) शहामृगांची धावण्याची क्षमता किती असते?

✓ ८) डोनाल्ड डकच्या काकांचे नाव अंकल स्क्रूज असे आहे.

# संस्कार

## सुभाषित

**अज्ञोऽपि तज्ज्ञतामेति शनैः शैलोऽपि चूर्ण्यते ।
बाणोऽप्येति महालक्ष्यं पश्याभ्यासविजृम्भितम् ।।**

अभ्यासाचा चमत्कार पाहा. अडाणी मनुष्यदेखील अभ्यासाने तज्ज्ञ बनतो. अभ्यासानेच पर्वताचा हळूहळू चुरा होतो. अभ्यासानेच बाण मोठ्या लक्ष्याचा वेध घेतो.

## सुविचार

ध्येय जितके महान, तेवढा त्याचा मार्गही लांब आणि खडतर असतो.
— साने गुरुजी

## गीता श्लोक

**यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम्। स्वकर्मणा
तमभ्यर्च्य सिद्धिं विन्दति मानवः।।**

ज्याच्यापासून सर्वभूतांची प्रवृत्ती झाली आहे, ज्याने हे जग निर्माण केले आहे, विस्तारले किंवा व्यापले आहे त्याची पूजा स्वभावानुसार प्राप्त झालेल्या कर्मांनी केली म्हणजे मनुष्याला सिद्धी प्राप्त होत असते.

## दिनविशेष



**२३ जानेवारी**

**२०१० -** जोगत्यांची वेदना मांडणाऱ्या 'जोगवा' या मराठी चित्रपटाला तब्बल पाच राष्ट्रीय पुरस्कार जाहीर. उत्कृष्ट सामाजिक चित्रपट श्रेणीत रजतकमळ आणि दीड लाख रुपयांचा पुरस्कार जाहीर.



**२५ जानेवारी**

**२००३ -** सेरिना विल्यम्सने मोठी बहीण व्हीनसला हरवून ऑस्ट्रेलियन टेनिस स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद मिळविले.



**२४ जानेवारी**

**२००४ -** भारताचा अष्टपैलू क्रिकेटपटू रॉबिन सिंग याने आंतरराष्ट्रीय तसेच प्रथमश्रेणी क्रिकेटमधून निवृत्ती जाहीर केली.

## बोधकथा

प्रशांत सरुडकर



# जन्मभूमी स्वर्गाहूनही श्रेष्ठ

**जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी ||**

रावणाच्या मृत्यूनंतर लंकेचा राजा म्हणून बिभीषणाचा राज्याभिषेक करण्यात आला. प्रभू रामचंद्रांचे पवित्र पाय आपल्या लंकेला लागावेत, असे बिभीषणाला वाटत होते. त्याने रामचंद्रांना विनंती केली, 'प्रभू,आपण काही दिवस या ठिकाणी राहावे. आपल्या सर्व सहकाऱ्यांसह आपण लंका फिरून पाहावी.' प्रभू रामचंद्रांचं लक्ष सर्व सवंगड्यांकडे गेले. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव प्रभूंच्या लक्षात आले. प्रभू रामचंद्र बिभीषणाला म्हणाले, 'माझे सवंगडी या ठिकाणी काही दिवस राहतील, सगळी लंका फिरतील. तुझा पाहुणचार घेतील आणि मग आम्ही अयोध्येला परत जाऊ'.

या गोष्टीचा वानर सेनेला अतिशय आनंद झाला व आनंदाने काही दिवस त्यांनी सर्व लंका फिरून पाहिली. लंका म्हणजे पृथ्वीतलावरील अप्रतिम सौंदर्याने नटलेले बेट. निळेशार समुद्रकिनारे, नारळीच्या बागा, लहान लहान पर्वत, हिरवीगार झाडी हे सर्व पाहताना प्रभू रामचंद्रांच्या सर्व सहकाऱ्यांना अतिशय आनंद झाला. बिभीषणाच्या राजमहालातून हे सर्व सहकारी प्रभू रामचंद्रांकडे आल्यानंतर, सर्वांच्या बोलण्यात लंकेच्या सौंदर्याचाच विषय होता. ते सर्व जण लंकेतच राहण्यासाठी उत्सुक होते. ही गोष्ट बिभीषणाच्याही लक्षात आली. प्रभू रामचंद्रांनी सर्व सवंगड्यांसह लंकेत राहावे. प्रभू रामचंद्रांचा सहवास जर आपल्या प्रजेला मिळाला तर ते मोठे भाग्य असेल, असे बिभीषणाला वाटल्याने तो प्रभू रामचंद्रांना म्हणाला, 'राजन, आपल्या सर्व सहकाऱ्यांची इथे राहण्याची इच्छा आहे. आपणही इथे राहण्याचा निर्णय घ्यावा. येथील प्रजाजनही आपणावरती जिवापाड प्रेम करतात. तरी आपण अयोध्येला जाऊ नये.' लंकेतच राहण्याबाबत लक्ष्मणानेही आग्रह धरला. लक्ष्मणाचा हा आग्रह ऐकताच प्रभू रामचंद्र लक्ष्मणाकडे आणि आपल्या सर्व सवंगड्यांकडे पाहून म्हणाले, 'लंका अप्रतिम आहे. इथे राहण्याचा आनंद काही वेगळाच आहे, हे खरे आहे. पण, जगातले प्रदेश कितीही सुंदर असले, तरी त्याला आपल्या मातृभूमीच्या सौंदर्याची सर येत नाही. आपली आई आणि आपली जन्मभूमी स्वर्गाहूनही श्रेष्ठ आहे. त्यामुळे आपणाला अयोध्येला जावे लागेल.

**अपि स्वर्णमयी लंका न मे लक्ष्मण रोचते |
जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी ||**

प्रभू रामचंद्रांचे म्हणणे सर्वांनाच पटले आणि सर्वजण अयोध्येच्या दिशेने निघाले.

## टाइम मॅनेजमेंट

**सुप्रिया पुजारी,** लाइफ कोच, समुपदेशक

# योग्य निर्णय व कम्फर्ट झोन

**आयुष्यातील प्रत्येक प्रसंग आपल्याला कोणतेतरी कौशल्य शिकवून जातो.** ही कौशल्ये भावी वाटचालीसाठी खुप उपयुक्त ठरतात. अशा सर्वांत मौल्यवान कौशल्यांपैकी एक म्हणजे योग्य निर्णय घेण्याची क्षमता. तुमचे आजचे निर्णय भविष्यातील यश आणि आनंदावर प्रभाव टाकतात. आता मेघाची गोष्ट पाहू, एका नवीन फोटोग्राफी क्लबमध्ये सामील व्हायचे की रोजच्या दिनचर्येला चिकटून फक्त अभ्यास करायचा, या प्रश्नाचा तिला सामना करावा लागला. तिने क्लब जॉईन करायचे ठरवले व ती स्वतःच्या कम्फर्ट झोनमधून बाहेर आली. तिला फोटोग्राफीची आवड निर्माण झाली. नवीन मित्र व मैत्रीणी भेटल्या. ती अभ्यासाचा व क्लबचा समतोल साधू लागली. हे उदाहरण ठळकपणे दाखवते की अगदी छोट्या छोट्या गोष्टींमध्येही योग्य निर्णय घेणे अनपेक्षित आनंदाचे दरवाजे उघडू शकतात.

**योग्य निर्णयाचे फायदे**

१. **योग्य निर्णय आपला आत्मविश्वास वाढवितात.**
२. **योग्य निर्णयाने आपली उद्दिष्टे लवकर पार पडतात.**
३. **योग्य निर्णय आपल्याला नवीन अनुभव देतात व आपल्याला अनेक गोष्टी शिकायला मिळतात.**
४. **निर्णयक्षमता तुम्हाला कोणत्याही बिकट प्रसंगाला सामोरे जाण्यास मदत करते.**

भविष्य उत्तम बनविण्यासाठी आपल्याला प्रत्येक निर्णय महत्त्वाचा असतो. मग ते शैक्षणिक, नातेसंबंध किंवा वैयक्तिक प्रगतीबद्दलचे असो. योग्य निवडी केल्याने तुम्हाला तुमच्या आकांक्षांनुसार भविष्य घडवण्याचे सामर्थ्य मिळते. आपण आत्ताच योग्य निर्णयांचे महत्त्व आत्मसात करायला हवे.

**लक्षात ठेवा : योग्य निर्णय हाच भविष्याचा पाया आहे**

## गुड मॅनर्स

### नम्रपणे बोला

मित्रांनो, छोट्यामोठ्या कामानिमित्त आपल्याला अनेक लोक भेटतात. आपण त्यांच्याशी कसं बोलतो, याचा कधी विचार केलाय? आपण लहान आहोत म्हणून कसंही बोलू शकतो, असा गैरसमज करून घेऊ नका. आपण लहान असलो तरी आपल्यामध्ये नम्रपणा असणे गरजेचे असते. नम्रपणा हा एक संस्कार आहे. आपण समोरच्या माणसाचा आदर केला की समोरचा माणूसही आपला आदर करतो. आपण आत्तापासूनच नम्रपणे बोलायला सुरुवात केली तर मोठेपणी कमालीचा नम्रपणा आपल्या अंगी येईल. आता तुम्ही म्हणाल, नम्रपणे बोलायचं म्हणजे नेमकं कसं बोलायचं? तर नम्रपणे म्हणजे शांतपणे, चिडचिड न करता, जादा उत्साह न दाखवता, समोरच्या माणसाचा आदर करत, त्याचा कसल्याही प्रकारचा अपमान न करता, साधेपणाने बोलणे होय. ज्याप्रमाणे आपण शिक्षकांशी बोलतो अगदी त्याचप्रमाणे आपण प्रत्येक व्यक्तीशी बोलायला हवे.

## हाक वसुंधरेची

# भूगोलाचा विस्तार



मित्र-मैत्रिणींनो या सदरातून आपण वसुंधरेच्या वेगवेगळ्या स्वरूपांची, त्यातल्या घटकांची, त्याचा मानवी जीवनावर होणाऱ्या परिणामांची माहिती घेत आहोत. **१५ जानेवारीला जगभर 'भूगोल दिन' साजरा झाला.** आज आपण भूगोलाच्या सर्वांत महत्त्वाच्या भागाची माहिती घेणार आहोत.

प्राकृतिक भूगोलामध्ये शिलावरण, जलावरण, वातावरण आणि जीवावरण (वनस्पती आणि प्राणी) यांचे प्रामुख्याने अध्ययन केले जाते. प्राकृतिक भूगोलाचे खूप विभाग आहेत. त्यातल्या प्रमुख शाखा पुढीलप्रमाणे -

**१. भूरूपशास्त्र** (Geo morphology) - पृथ्वीच्या पृष्ठभागाचा अभ्यास.
**२. भूगर्भशास्त्र** (Geology) - खडक आणि पृथ्वीचे घन घटक यांचा अभ्यास.
**३. हवामानशास्त्र** (Climateology) - हवामानाचा अभ्यास.
**४. समुद्रशास्त्र** (Oceanography) - सागर आणि उपसागर यांचा अभ्यास.
**५. जैवभूगोलशास्त्र -** विशिष्ट प्रदेशातील वनस्पती व प्राणी यांचा अभ्यास.
**६. मृदा भूगोल -** मातीचा अभ्यास.
**७. जलावरण शास्त्र** (hydrology) - जलचक्र आणि पाण्याच्या वेगवेगळ्या स्त्रोतांचा अभ्यास
**८. पर्यावरणीय भूगोल -** पर्यावरणाच्या वेगवेगळ्या पैलूंचा अभ्यास

यामध्ये भूरूपशास्त्र ही सर्वांत नवीन अभ्यासशाखा आहे. या सर्व विषयांच्या विस्तारांकडे बघितले की आपल्याला भूगोल ही सर्व शास्त्रांची जननी आहे, हे पटते.

## योग जीवन

मनाली देव

# परिवर्त उष्ट्रासन

**परिवर्त उष्ट्रासन हे बैठक स्थितीमधील तोलात्मक पण थोडेसे अवघड आसन आहे.**

### असे करावे आसन

- हे आसन करण्यासाठी प्रथम उष्ट्रासनाचा योग्य तो सराव व कमरेतून वळून करण्याच्या आसनांचा योग्य तो सराव होणे अपेक्षित आहे.
- प्रथम गुडघ्यावर उभे राहावे. पायात साधारणपणे खांद्याएवढे अंतर घ्यावे.
- आता कमरेतून प्रथम मागे वाकावे. त्यानंतर डाव्या हाताने उजवी टाच व उजव्या हाताने डावी टाच पकडून कंबर व पाठीतून मागे वळावे. मानही मागच्या दिशेला वळवावी.
- शक्य असेल तेवढा वेळ स्थिर राहावे.
- छायाचित्रात दाखविल्याप्रमाणे आसनस्थिती घेण्याचा प्रयत्न करावा.
- आसन सोडताना सावकाश उलट क्रमाने आसन सोडावे व दुसऱ्या बाजूनेसुद्धा करावे. या वेळी श्वसन संथ सुरू ठेवावे .

### लाभ

- या आसनाच्या सरावाने कमरेचे, पाठीचे स्नायू अधिक लवचिक व कार्यक्षम होतात. नवीन व अवघड आसन केल्याचा आनंद मिळतो.
- पचनसंस्थेचे कार्य अधिक सुरळीत होते.
- हे स्पर्धात्मक आसन आहे, त्यामुळे लहान मुलांसाठी फायदेशीर आहे.



**काळजी :**
- **हे थोडेसे अवघड आसन असल्याने शक्य असेल तेवढेच करावे. जबरदस्तीने झटका देऊन करू नये. योग्य मार्गदर्शन घेणे खूप आवश्यक आहे. गुडघ्यांचा त्रास असेल तर हे आसन करणे टाळावे.**

## वाचू आनंदे

# सगळ्यांच्या आवडीच्या गंमतगोष्टी

**मित्रांनो आणि मैत्रिणींनो, तुम्ही मोबाईल हातात घेतला की आई-बाबा ओरडतात ना? पण मग मोबाईल आणि टीव्हीपण नाही पाहायचा, तर काय करायचं, असा प्रश्न पडला असेल ना? यावर एकदम उत्तम उत्तर म्हणजे गोष्टीचं पुस्तक वाचणे. आज आपण अशाच एका सुंदर गोष्टीच्या पुस्तकाची ओळख करून घेणार आहोत, ज्याचं नाव आहे गंमतगोष्टी.**

**होय, नावाप्रमाणेच या पुस्तकात एकदम गमतीदार गोष्टी आहेत. रोज एक गोष्ट वाचली तरी तुम्ही एक महिनाभर एक पुस्तक वाचू शकता. कारण यामध्ये तब्बल तीस गोष्टी आहेत. गडबडगुंडा, सुपरमॅन, छोटा भीम, लांबनाक्या, भोपळा, शेपटी अशा कितीतरी गोष्टी तुम्हाला भारावून टाकतात. तुम्ही या गोष्टी वाचा आणि तुमच्या छोट्या भावाला किंवा छोट्या बहिणीलाही वाचून दाखवा. आता तुम्हाला वाटेल की या पुस्तकात मोठ्या मोठ्या गोष्टी आहेत का? तर अजिबात नाही. पुस्तकामध्ये एकदम छोट्या छोट्या आणि गमतीदार गोष्टी आहेत. या गोष्टी वाचून तुमची करमणूक तर होईलच शिवाय तुम्हाला वेळेचे महत्त्व समजणे, सर्वांशी प्रेमाने वागणे, खरे बोलणे, आदर करणे अशा चांगल्या चांगल्या सवयीही लागतील. पुस्तकामध्ये चित्रेही असल्याने गोष्टी समजायला अजून सोपे जाते. संगीता पुराणिक यांनी हे पुस्तक लिहिले असून अनुश्री प्रकाशनने प्रकाशित केले आहे.**





? ६) भूगोल दिन कधी साजरा केला जातो?

✔ ३) कार्यक्रमांचं नियोजन करणाऱ्याला 'इव्हेंट मॅनेजर' असे म्हणतात.

# घरच्या घरी प्रयोगशाळा...!

— अशोक तातुगडे

मित्र-मैत्रिणींनो! आज आपण दोन अत्यंत मजेशीर प्रयोग पाहणार आहोत. या प्रयोगांमधून तुम्हाला हसत-खेळत वैज्ञानिक तत्त्वे शिकता येणार आहेत. हे दोन्ही प्रयोग करताना जणू काही आपण जादूच करत आहोत की काय, असे तुम्हाला वाटेल. त्यामुळे मित्र-मैत्रिणींच्या मदतीने हे दोन्ही प्रयोग करताना तुम्हाला खूप धमाल येईल. दोन्ही प्रयोगांतून तुम्हाला काय जाणवले, तुम्ही काय निष्कर्ष काढला, त्याची चर्चा तुमच्या शिक्षकांशी करा.



## काडीपेटीची जादू

काडीपेटीची जादू हा एक गमतीशीर प्रयोग आहे. या प्रयोगात आपण थोडी जादू करणार आहोत. २-३ मित्रांबरोबर तुम्हाला हा प्रयोग करताना आणखी मजा येईल. तुम्ही त्यांना सांगा की, तुम्ही जादू करत आहात. मात्र, प्रत्यक्षात तुम्ही प्रयोगच करत असाल. मित्रांना मात्र तुम्ही जादू करत आहात असेच वाटेल. प्रयोगाच्या सुरुवातीला तुमच्या मित्रांना सांगा की, बघा मी हात न लावता दोऱ्यांच्या रंगांची अदलाबदल करू शकतो. तुमची ही जादू पाहून ते थक्क होतील आणि तुमचं कौतुकही करतील. चला तर, बघूया ही जादू!

### साहित्य

दोन फूट लांबीचे दोन वेगवेगळ्या रंगांचे (गडद व फिका) लोकरीचे धागे. उदा. लाल व राखाडी, रिकामी काडीपेटी, सुई.

### कृती

काडीपेटीच्या रिकाम्या बॉक्समध्ये - म्हणजे ज्यात काड्या असतात तो भाग - त्याला मोठा सुईने विरुद्ध दिशेच्या कोपऱ्यावर छिद्रे करा. लोकरीचा गडद रंगाचा दोरा या विरुद्ध दिशेच्या छिद्रांमधून ओवून घ्या. तसाच फिक्या रंगाचा दोरा पण ओवून घ्या. मदतीसाठी आकृती बघा. आता काडीपेटी बंद करा. त्यामुळे बघणाऱ्याला काडीपेटीच्या आत काय केले आहे ते कळणार नाही. दोन्ही दोऱ्यांच्या दोन्ही बाजूच्या टोकांना गाठी बांधून घ्या. आता दोन्ही दोऱ्यांची टोके हाताने ताणून पकडा. मदतीसाठी आकृती बघा. आता मित्राला काडीपेटी हळूहळू दोऱ्याच्या एका बाजूने दुसऱ्या बाजूला सरकवायला सांगा. हे करताना दोऱ्यांच्या परिस्थितीमध्ये काय बदल होतोय? ते बघायला सांगा.

### निरीक्षण व निष्कर्ष

काडीपेटी एका बाजूकडून दुसऱ्या बाजूकडे हळूहळू सरकताना एका दोऱ्याचा रंग दुसऱ्या दोऱ्याच्या रंगांमध्ये बदलत जाताना आपल्याला दिसेल. म्हणजे समजा गडद रंग वरच्या बाजूला असेल तर तो आता खालच्या बाजूला दिसेल. आहे ना रंग बदलायची जादू? चला तर मग, करून बघूया!





## नृत्य करणारी बाटली

मित्र-मैत्रिणींनो, हा देखील एक मजेशीर प्रयोग आहे. सूर्यापासून मिळणाऱ्या उष्णतेचा आणि उष्णता मिळाल्यावर प्रसरण पावणाऱ्या हवेसंबंधीचा हा प्रयोग आहे. यामध्ये चक्क हवेत नाचणारी बाटली आपल्याला पाहायला मिळणार आहे. यामुळे हा प्रयोग करतानाही तुम्हाला मजा येईल. तुमच्या मित्र-मैत्रिणींना हा प्रयोग करून दाखवा आणि त्यांच्याशी चर्चा करा.

### साहित्य

१२ x ८ इंच आकाराचा जाड काळा कागद, प्लॅस्टिकची बाटली, डिंक, मध्यभाग खोलगट असलेली प्लेट, पाणी.

### कृती

प्लॅस्टिकच्या बाटलीच्या सभोवती काळा कागद डिंकाने चिकटवून घ्या. नंतर सर्व साहित्य घेऊन जास्तीत जास्त ऊन पडते अशा ठिकाणी जा. प्लेटमध्ये जवळजवळ प्लेट भरेल एवढे पाणी भरा. त्यामध्ये बाटली, झाकण काढून उलटी करून ठेवा. बाटलीचे तोंड पाण्यामध्ये पूर्णपणे बुडेल असे बघा. साधारणपणे बाटलीचे बूच लागते तेवढी जागा पाण्यात गेली पाहिजे. दहा-पंधरा-वीस मिनिटांनी बाटलीचे निरीक्षण करत रहा.

### निरीक्षण व निष्कर्ष

उन्हात ठेवल्यापासून काही मिनिटांनी बाटली थोडीशी हलल्यासारखी दिसेल, पण अजून काही मिनिटांनी तर ती खूपच हलू लागेल आणि इकडे-तिकडे नाचल्यासारखी दिसेल. हे कशामुळे होते? बाटलीच्या आत असलेली हवा सूर्य प्रकाशाने गरम होते आणि प्रसरण पावू लागते; पण त्या हवेला बाहेर जाण्यासाठी रस्ता नसल्यामुळे ती बाटलीच्या तोंडातून बाहेर पडण्याचा प्रयत्न करत असते आणि त्या प्रयत्नात दाब निर्माण होऊन बाटलीची हालचाल सुरू होते. या हालचालीत कदाचित काही वेळा बाटलीच्या तोंडाचा भाग पाण्यातून वर येतो आणि त्यातून हवा आत जाते मग मात्र बाटलीची हालचाल बंद होते.

---



## अॅप माझे

वैभव गाटे

**गणित विषय अनेकांच्या नावडीचा असतो. त्यामुळे गणिताचा अभ्यास करताना अनेकांना कंटाळाही येतो. परंतु, ‘मायक्रोसॉफ्ट’चे ‘मॅथ्स सॉलव्हर’ तुमचा हा कंटाळा दूर करेल. तसेच गणिताचा अभ्यास करताना तुम्हाला येणाऱ्या समस्याही चुटकीसरशी दूर करेल. चला तर, जाणून घेऊयात की, नक्की काय आहे हे अॅप!**



## गणित होईल आवडीचे

**कोठे उपलब्ध?**
प्ले स्टोअर,
अॅपल अॅप स्टोअर

**कोठे वापरता येणार?**
मोबाईल, टॅब

**कोण वापरू शकते?**
इयत्ता ५ वीच्या पुढील विद्यार्थी

**किंमत?**
सर्वांसाठी मोफत

### ‘मॅथ्स सॉलव्हर’बद्दल


गणिताचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन मायक्रोसॉफ्टने हे अॅप तयार केले आहे. विद्यार्थ्यांना गणिताची गोडी लागावी आणि गणिताचा अभ्यास सोपा व्हावा, हे या अॅपचे उदिष्ट आहे. जगभरातून या अॅपला विद्यार्थ्यांची पसंती मिळते आहे. याचे वैशिष्ट्य म्हणजे, आपल्याला सोडवता न येणाऱ्या गणिताचा फोटो काढायचा अन् अॅप चुटकीसरशी गणिताचे ते समीकरण सोडवून देते. तेही स्टेप बाय स्टेप. आहे की नाही हे अॅप खूप उपयोगी? तुम्हीही गणिताचा अभ्यास करताना याची मदत नक्की घ्या.

### वैशिष्ट्ये

- पुस्तकातील किंवा वहीतील गणिते स्कॅन करून सोडावता येतात.
- गणित टप्प्या-टप्प्याने कसे सोडवले याचे विश्लेषण करून दिले जाते.
- सायंटिफिक कॅलक्युलेटर उपलब्ध.
- गणित सोडवण्याचे कौशल्य वाढवण्यात मदत.
- गणित आणखी पक्के करण्यासाठी विविध गेम्स.
- ग्राफिक कॅलक्युलेटरचा समावेश.
- प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून दररोज गणिताचा सराव करता येणार.
- गणिते सोडवताना व्हिडिओची मदत घेता येणार.

## शिका वळणदार करसिव्ह रायटिंग

**‘सुंदर अक्षर हाच खरा दागिना’ असे तुम्ही शाळेत अनेकदा ऐकले असेल.** कदाचित हस्ताक्षर स्पर्धेत भागही घेतला असेल आणि बक्षीसही पटकावले असेल. आपल्यापैकी अनेकांची इच्छा असेल की त्यांना इंग्रजीची सुंदर, वळणदार करसिव्ह रायटिंग यावी. तुमची ही इच्छा पूर्ण करेल, कर्सिव्ह लेटर रायटिंग विझार्ड हे अॅप. तेही घरच्या घरी. चला तर, पाहूया कसे वापरता येईल हे अॅप!



### अॅपबद्दल

प्रत्येक विद्यार्थ्याला सहज, सोप्या पद्धतीने कर्सिव्ह रायटिंग शिकता यावे यासाठी हे अॅप तयार करण्यात आले आहे. येथे विविध इंग्रजी अक्षरे दिली असून, ती कशा प्रकारे गिरवावी, हेदेखील सांगितले आहे. त्यावर तुम्ही सरावही करू शकता. यामध्ये अक्षरे, अंक या सर्वांचा समावेश करण्यात आला आहे. याची खासियत म्हणजे, या अॅपमध्ये तुम्ही तुमच्या आवडीचे शब्ददेखील समाविष्ट करू शकतात.

### वैशिष्ट्ये

- इंग्रजीतील सर्व अक्षरांचा समावेश.
- वळणदार अक्षर गिरवल्यावर ते किती बरोबर आहे? यानुसार स्टार मिळतात.
- शब्द गिरवताना काठिण्यपातळी निश्चित करता येते.
- शब्द प्रिंट आणि पीडीएफ करण्याची सोय.
- ५० अॅनिमेटेड स्टिकर आणि पेन्सिलचा समावेश.
- स्वतःच्या शब्दांची यादी तयार करता येणार.
- लिखाणातील प्रगती तपासण्यासाठी अहवाल.

**कोठे उपलब्ध?**
- प्ले स्टोअर, अॅपल अॅप स्टोअर

**कोठे वापराल?**
- मोबाईल, टॅब

**कोण वापरू शकते?**
- इयत्ता चौथीपुढील विद्यार्थी

**किंमत?**
- सर्वांसाठी मोफत







?(७) गणिते सोडवण्यासाठी मायक्रोसॉफ्टने कोणते अॅप तयार केले?

२) अत्तराच्या काचेच्या बाटलीला कुपी असे म्हणतात.

मित्रांनो तुम्हाला अंकल स्क्रूज माहिती असतीलच ना? अंकल स्क्रूज म्हणजे आपल्या डोनाल्ड डकचे काका बरं का. जगातील सर्वांत श्रीमंत बदक म्हणून कार्टून विश्वात ओळखल्या जाणाऱ्या अंकल स्क्रूजची आज आपण माहिती घेणार आहोत. चला तर मग, अंकल स्क्रूज कसे तयार झाले ते वाचूया.

# जगातील सर्वांत श्रीमंत बदक ‘अंकल स्क्रूज’



## १९५२ चा जन्म

डिस्ने स्टुडिओचे चित्रकार कार्ल बार्क्स हे अंकल स्क्रूजचे जनक. जगभरात प्रसिद्धी मिळवणाऱ्या स्क्रूज यांना युरोपमध्ये विशेष लोकप्रियता मिळाली. आज टेलिव्हिजन, मासिक, चित्रपट, व्हिडिओ गेम्समधून अंकल स्क्रूज घराघरांत पोहचले. पण, त्यांची खरी सुरूवात झाली ती १९५२ मध्ये. त्या वेळी ‘अंकल स्क्रूज’ नावाचे कॉमिक्स स्वतंत्रपणे प्रकाशित होत होते.

## लकी कॉइन

अंकल स्क्रूज हे सतत संपत्ती वाढविण्याच्या नादात असतात. अनेक मालिकेत ते खलनायकाचा सामना करत आपल्या मालमत्तेचे संरक्षण करताना दिसतात. या लोकांचा स्क्रूज यांच्या संपत्तीवर डोळा असतो. जगातील सर्वात श्रीमंत बदक ही उपाधी काढून घेण्यासाठी त्यांचे शत्रू आसुसलेले असतात. अनेक कथानक स्क्रूज यांच्याकडे असलेल्या नाण्याभोवती फिरतात. हे नाणे स्क्रूज यांच्या चांगल्या नशिबाचा आणि श्रीमंत होण्याचा स्रोत असते. शत्रूपासून हे नाणे सुरक्षित राहण्यासाठी अंकल स्क्रूज हे नाणे एका काचेच्या जारमध्ये ठेवून तो जार नेहमी तिजोरीत ठेवतात.



## कार्टूनमध्ये काय ?

**बिगल बॉयज, फ्लिनहार्ट ग्लोमगोल्ड आणि मॅजिका हे अंकल स्क्रूज यांचे प्रमुख शत्रू.** तर लुई, ड्यूई आणि हुई हे त्यांचे तीन पुतणे. लाल, निळ्या आणि हिरव्या रंगाचे कपडे घालणारे हे अवलिया पात्र स्क्रूज मॅकडकजवळ राहतात आणि त्यांना सतत मदत करतात. लॉचपॅड मॅकक्वॉर्क हा या पात्रांचा विश्वासू साथीदार आणि वैमानिक. डकबर्ग नावाच्या काल्पनिक शहरातील हे रहिवासी असून गायरो हे त्यांचे वैज्ञानिक सल्लागार आहेत.




## फोर्ब्समध्ये दखल

**डकटेल्स या मालिकेतून अंकल स्क्रूज यांचे किस्से आपल्यासमोर येतात. २००२ मध्ये फोर्ब्स मासिकाने स्क्रूज मॅकडकला जगातील सर्वाधिक श्रीमंत असलेले चौथे काल्पनिक पात्र म्हणून घोषित केले.** मात्र २००५ मध्ये त्यांच्या रेटिंगमध्ये दोन क्रमांकाने घसरण झाली. त्यानंतर २००६ मध्ये उसळी घेत स्क्रूज यांनी तिसऱ्या क्रमांकावर धडक मारली. स्क्रूज मॅकडफ हे पैसे वाचवण्यासाठी कोणत्याही हद्दीपर्यंत जाऊ शकतात, अशी त्यांची ख्याती होती.

## डिस्नेला फायदा

**‘डकटेल्स’चे नायक अंकल स्क्रूजने डिस्ने ॲनिमेशन स्टुडिओला गतवैभव मिळवून देण्यास मोलाचा वाटा उचलला.** अनेक टीकाकारांच्या मते, डिस्ने स्टुडिओने आपले वलय १९८० च्या दशकात गमावले होते. १९६० च्या दशकात वॉल्ट डिस्ने यांचे निधन झाल्याने काही काळानंतर या स्टुडिओला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. मात्र, अनेक जोखीम उचलत स्टुडिओने वाटचाल केली आणि ती फायदेशीर राहिली. त्यापैकीच डकटेल्स ही एक जोखीम होय. या कथानकाने डिस्नेला भरभरून फायदा मिळवून दिला.



अर्थमंत्र

# ‘कर’ म्हणजे काय?




**दोस्तांनो, कर, करआकारणी, टॅक्स, इन्कम टॅक्स असे कित्येक शब्द तुमच्या कानावरून जात असतील. आई-बाबांच्या किंवा घरातील मोठ्या भावंडांच्या तोंडातही टॅक्स, कर वगैरे शब्द असतील. हा टॅक्स म्हणजेच कर का भरावा लागतो? तो भरणं का आवश्यक असतं? त्यामुळे काय होतं? भरला नाही तर काय होऊ शकतं आणि भरल्याने आपल्याला कोणते फायदे होऊ शकतात? हे आपण आज जाणून घेऊया.**

## कर म्हणजे नक्की काय?

कर म्हणजे सरकारी खर्च भागवण्यासाठी नागरिकांकडून वसूल केली जाणारी रक्कम. नागरिकांसाठी सरकार अनेक कामं करत असतं. त्यात पाणीपुरवठा करण्यापासून रस्तेबांधणीपर्यंत अनेक प्रकारची कामं असतात. या सर्व कामांसाठी लागणारा पैसा कराच्या माध्यमातून उभा केला जातो. उदा. आपल्या घरी नळातून पाणी येतं. त्याबद्दल आपण महापालिका किंवा नगर परिषदेला पाणीपट्टी देतो. आपण रस्त्यावरून प्रवास करतो त्याच्या बदल्यात आपण ‘टोल’ भरतो. विविध प्रकारच्या वस्तू आपण विकत घेतो त्यावर ‘जीएसटी’ द्यावा लागतो. हे सर्व कराचेच प्रकार आहेत. सेवा आणि अन्य बाबींवरील सरकारी खर्च जसजसा वाढत जातो, तसं कराचं प्रमाणही वाढत जातं.


## बिल आणि करातील फरक

- आपण एखादी वस्तू विकत घेतो, तेव्हा त्याचं ‘बिल’ येतं. ती रक्कम आपण संबंधित दुकानदाराला देतो आणि त्याचा काही भाग कर म्हणून सरकारकडे जमा केला जातो. तो कर विक्रेत्यांसाठीचा असतो. सरकार तो त्यांच्याकडून वसूल करतं.
- करस्वरूपात दिली जाणारी रक्कम थेट सरकारकडे जमा होते. बिलाची रक्कम ही त्या विक्रेत्याकडे जमा होते. त्यातून काही भाग म्हणून तो कर भरतो.
- आपण वस्तू विकत घेतली, तरच बिल भरावं लागतं. त्यामुळे तो आपल्या इच्छेचा भाग असतो. कर अनिवार्य असतो. कारण, बऱ्याचदा तो आपल्या दैनंदिन गोष्टींवर लागू होतो.




## उत्पन्नावरील कर

तुमचे आई-वडील किंवा घरातील मोठी माणसं ‘इन्कम टॅक्स’ भरत असतील. त्यांच्याकडून हा शब्द तुम्ही ऐकला असेल. इन्कम टॅक्सला मराठीत प्राप्तिकर (हिंदीत आयकर) असं म्हणतात. कोणत्याही उत्पन्नावरील कर म्हणजे प्राप्तिकर. हा विशिष्ट बाबींपासून निर्माण झालेल्या प्राप्तीवर व एकंदर प्राप्तीवर आकारतात. प्राप्तिकर हा प्रत्यक्ष कर आहे. म्हणजे हा कर त्या त्या संबंधित व्यक्तीला द्यावा लागतो. त्याचा भार विक्रीकराप्रमाणे दुसऱ्यावर टाकता येत नाही. हा कर सरकारच्या उत्पन्नाचं एक प्रमुख साधन आहे. आपल्या देशात सरकारकडे या कराच्या माध्यमातून खूप मोठ्या प्रमाणात पैसे जमा होतात. त्याचा वापर विविध विकासकामांसाठी केला जातो.



## कर भरण्याचे फायदे




1. आपण जो कर भरतो, त्यातून आपल्याला विविध सेवा मिळतात.
2. कर भरल्याची नोंद सरकारकडे होते. त्यामुळे आपलं उत्पन्न कायदेशीर आहे किंवा आपल्याला मिळत असलेल्या सर्व सोयी सरकारकडूनच मिळत आहेत असा त्याचा अर्थ होतो.
3. देशाच्या विकासात योगदान देण्याची संधी आपल्याला यामुळे मिळते. आपण सर्वांनी दिलेल्या कराच्या पैशांतून देशभर विविध प्रकल्प, सुविधा राबवल्या जातात.

## कर न भरल्यास...

- वेळोवेळी त्या त्या सेवेवरील कर न भरल्यास सरकारकडून ती सेवा बंद केली जाऊ शकते. जसे की, पाणीपट्टी न भरल्यास पाणीपुरवठा बंद होऊ शकतो.
- गाडी किंवा घरासारखी एखाद्या मोठ्या गोष्टीची खरेदी करताना कर्ज काढावे लागते. प्राप्तिकर न भरणाऱ्या व्यक्तींना कर्ज मिळण्यात अडचणी निर्माण होतात.
- कर न भरणे कायदेशीर गुन्हा आहे. त्यामुळे कर न भरल्यास दंड म्हणून काही रक्कम घेतली जाते. तसेच, कारावासासारखी कठोर शिक्षाही होऊ शकते.

स्मार्ट माहिती

# अशा कॉल्सपासून सावधान!

मित्र-मैत्रिणींनो, तुमच्या घरात लँडलाइन दूरध्वनी असेल किंवा तुमच्या हातात आजी-आजोबांचा, आई-बाबांचा मोबाईल असताना काही वेळा आर्थिक गोष्टींबाबत माहिती विचारणारे काही कॉल्स येतात. असे कॉल्स आल्यास काय करायचं? हे आज आपण बघू या.


## दुसऱ्यांसाठीचे कॉल घेऊ नका

**एक सगळ्यात महत्त्वाची गोष्ट म्हणजे दुसऱ्यांसाठीचे कॉल घ्यायचे नाहीत.** म्हणजे बघा, तुमच्याकडे काही कारणानिमित्त मोठ्यांचा फोन असेल आणि त्यावर कोणाचा कॉल आला, तर तुम्ही शक्यतो तो घ्यायचा नाही. विशेषतः अनोळखी नंबरवरून कॉल आला तर अजिबातच घ्यायचा नाही. समजा, ‘मला आलेले कॉल घे’ असा निरोप मोठ्यांनी दिला असेल, तर कोणतेही कॉल घेताना अतिशय कमी आणि नेमकं बोला. ‘हा अमुक अमुक यांचा फोन आहे, तुमचा काही निरोप असल्यास सांगा’ एवढंच सांगा.

## कशी होते फसवणूक?

**काही वेळा ‘तुम्हाला बक्षीस लागलं आहे, त्याची रक्कम देण्यासाठी बँक अकाऊंटचे तपशील द्या’ असं सांगितलं जातं.** ‘अकाऊंटमध्ये प्रॉब्लेम आहे’, ‘केवायसी झालेलं नाही’ असंही सांगून अकाऊंटचे तपशील विचारले जातात. कोणतीही बँक किंवा एलआयसीसारखी आर्थिक संस्था फोनवरून असे तपशील विचारत नसते हे लक्षात ठेवा. ‘अमुक महाग गाडी खूप कमी किमतीत उपलब्ध होणार आहे, त्यासाठी क्रेडिट कार्डचे तपशील द्या’ असंही सांगितलं जातं. भुरळ घालणारी बक्षिसं कोणी फोनवरून कशाला देईल? असा प्रश्न आपल्याला पडलाच पाहिजे. क्रेडिट कार्डचे तपशील तर कुणालाच द्यायचे नाहीत, कारण कुणीही ते तपशील वापरून त्यावर कितीही रकमेची खरेदी करू शकतं. बँकेच्या अकाऊंटचा पूर्ण नंबर आणि इतर तपशीलही फोनवर विचारले जात नाहीत. त्यामुळे असे तपशील अजिबात द्यायचे नाहीत.






## आर्थिक माहिती गोपनीय

मोठ्यांच्या फोनवर पलीकडची व्यक्ती- विशेषतः बँक अकाऊंट, एलआयसी अकाऊंट, पेमेंट वगैरे विषयांवर माहिती विचारायला लागली, तर ‘मला माहित नाही’ असं सांगून टाका. घरातली कोणतीही माहिती - अगदी तुम्हाला माहीत असली तरी ती - कुणालाही सांगायची नसते, ही गोष्ट नक्की लक्षात ठेवा. क्रेडिट कार्डांचे तपशील, बँक अकाऊंटची माहिती, बँक अकाऊंट नंबर अशा गोष्टी फोनवरून कुणीही अधिकृत व्यक्ती विचारत नाही. त्यामुळे अशी माहिती कुणी खोदून खोदून विचारायला लागलं, तर त्यात काही शंकास्पद आहे हे धरून चाला.

## तुमचीही माहिती देऊ नका

दोस्तांनो, मोठ्यांच्या फोनवर बनावट कॉल येतात, तसे तुमच्याही फोनवर किंवा लँडलाइनवर तुमचं नाव घेऊनसुद्धा येऊ शकतात बरंका. कुठल्याही अनोळखी नंबरवरून आलेल्या कॉलवर तुमचा आधार नंबर, बँकेचा अकाऊंट नंबर किंवा आई-वडिलांचा पगार, बँक अकाऊंट नंबर आणि इतर तपशील देऊ नका.

## निरोप व्यवस्थित लक्षात ठेवा

दोस्तांनो, बनावट कॉल येत असले, तरी काही वेळा बँकेतून आणि इतर आर्थिक संस्थांमधून महत्त्वाचे कॉलही आलेले असू शकतात. त्यामुळे जो काही निरोप त्यावर सांगितला असेल तो लक्षात ठेवा. ज्या व्यक्तीसाठी तो कॉल आला असेल ती व्यक्ती नंतर त्या कॉलबाबत खातरजमा करून संबंधित काम करेल.




## घरातल्यांनाही सांगा

**मित्रांनो, तुम्ही स्वतः बनावट कॉलवर गोपनीय आर्थिक माहिती देऊ नकाच, शिवाय आजी-आजोबा, आई-बाबा यांनाही अशी माहिती देऊ नका असं सांगा. कुठल्याही आमिषाला बळी पडू नका. महाग बक्षीसं उगाच कुणी कशाला देईल, असा प्रश्न मोठ्यांनाही विचारा.**


? १) इनकम टॅक्सला मराठीत काय म्हणतात?

✔ ६) भूगोल दिन १५ जानेवारीला साजरा केला जातो.

खालील चित्रांमधील अधिकाधिक फरक शोधा.




मनीमाऊला तिच्या पिल्लापर्यंत पोहोचायचं आहे. तिला रस्ता दाखवता का ?



खालील कोड्यामध्ये शाळेसाठी उपयोगी पडणाऱ्या वस्तू आहेत. ओळखा बरं !





डोकं चालवा आणि गणित सोडवा.




अनुक्रमाने अंक जोडा. बघा बरं काय तयार होतंय...




डायनासोरच्या पिल्लाचे चित्र रंगवा.



खेळ खेळूयात

डॉ. अमृता देशपांडे-देशमुख



# पतंग - कौशल्याचा खेळ

**संक्रांतीच्या वेळी खेळला जाणारा पतंग हा विशेष खेळ आहे. खूप शारीरिक कष्टाचा नसला तरी हा कौशल्याचा खेळ आहे. या दिवसात आकाशात उंच उडणारे रंगीबेरंगी विविध आकारांचे पतंग पाहिले की आपल्यालाही खेळावेसे वाटते.**

**साहित्य -**
यासाठी लागणारे साहित्य म्हणजे कामट्याच्या काडीचा आधार घेऊन चौकोनी कागद चिकटवून केलेले पतंग. कामटीची एक काडी उभी आणि एक कमान करून एकमेकांस चिटकवून त्याला चौकोनी कागद लावून पतंग बनवला जातो.

**पारंपरिक पतंग खेळ -**
काडीच्या विरुद्ध बाजूला दोन्ही बाजूंना समान अंतरावर दोरी ओवून घेतली जाते तिला ‘कन्नी’ म्हणतात. तिच्या मध्यभागी लांब दोरी बांधली जाते तिला मांजा म्हणतात. तिचे एक टोक आपल्या हातात ठेवून हवेच्या झोतासोबत पतंग सोडून देणे आणि आणि तो हवेसोबत उंच उडवत राहणे आणि नियंत्रित करणे हा मूळ खेळ आहे.

**मैदानी पतंग पकड -**
शहरात बऱ्याच वेळा पतंग उडवायला मोकळी जागा, मोकळी हवा नसते. गच्चीवर जाऊन पतंग उडवणे हे फारसे सुरक्षित नसते म्हणून आपण पाहूया पतंगाचा मैदानात खेळण्याचा प्रकार. या खेळासाठी पतंगाची शेपूट लांब नसावी. यात दोनपेक्षा जास्त कितीही खेळाडू असतील तर मजा येते.

१. राज्य घेणाऱ्याने पतंग हातात धरून वेगात पळायचे आहे आणि त्याच्या मागे बाकीच्यांनी पळून पतंगाला पकडायचे असा हा खेळ आहे.

२. राज्य घेणाऱ्याने पतंगाच्या दोरीला योग्य ताण देऊन एका हाताने दोरीला पकडून ठेवायचे आणि दुसऱ्या हातात दोरीचे टोक ठेवायचे.

३. आक्रमण करणाऱ्यांनी पतंगाला पकडायचे आहे. जो पतंगाला पकडेल त्याला पुढील डावात पतंग उडवायला मिळते.

४. जो जास्तीत जास्त वेळ बचाव करत पतंग उडवेल तो या खेळात विजयी होईल.

५. पतंग नसेल तर प्लॅस्टिकच्या पिशवीला दोरी बांधून हा खेळ खेळता येतो. पिशवी हवेत सहज उंच उडते आणि खेळात खूप मजा येते.

**कौशल्य:**
- या खेळात सर्व खेळाडूंचा पळण्याचा व्यायाम होतो.
- राज्य घेणाऱ्या खेळाडूला पतंग हातात उंच धरून पळायचे असते. यामध्ये त्याची हाताची ताकद आणि नियंत्रण वाढते.
- हळूच मागे पाहत इतरांना चकवत पतंग खाली न येऊ देता पळाल्याने तोल, समन्वय ही कौशल्य वाढीस लागतात.
- आक्रमण करणाऱ्या खेळाडूंना मध्ये उंच उड्या मारत पळावे लागते. यामधे पायांची ताकद वाढते, तोल सुधारतो.
- या खेळात खेळणाऱ्याचा दमश्वास (endurance), वेग आणि ताकद वाढते.

**चला तर मग मैदानी पतंग खेळून पाहा आणि तुमचा अनुभव कसा होता? हे आम्हाला नक्की कळवा.**

शिष्यवृत्ती इयत्ता ५ वी

मीरा गोविंद जाधव

# विषय - मराठी

## घटक – २ कार्यात्मक व्याकरण

## उपघटक - वाक्याचे भाग

प्रिय मित्र-मैत्रिणींनो कार्यात्मक व्याकरणातील 'वाक्याचे भाग' या उपघटकाचा आज आपण अभ्यास करणार आहोत.

**वाक्याचे दोन भाग असतात.**

१) उद्देश्य २) विधेय

१) उद्देश्य : क्रिया करणारा हा मुख्यभाग उद्देश्याचा असतो तसेच त्याच्या संबंधाने येणारे शब्दसुद्धा उद्देश्य भागात येतात.

वाक्यात ज्याच्याविषयी सांगितले आहे, त्याला उद्देश्य म्हणतात. थोडक्यात उद्देश्य म्हणजे कर्ता होय. तसेच कर्त्याच्या संबंधाने येणारे शब्द ही उद्देश्याचाच भाग असतात.

उद्देश्य हे बहुतेकवेळा वाक्याच्या सुरुवातीस येते. पण कधी कधी आधे-मध्येसुद्धा येऊ शकते.

**उदा. :** १) कोंबडा आरवला. उद्देश्य - कोंबडा

२) मुंगी हा समाजप्रिय किटक आहे. उद्देश्य - मुंगी

क्रियापदास किंवा क्रियापदासह सहायक क्रियापदास कोण अथवा कोणी असा प्रश्न विचारल्यावर मिळणारे उत्तर हे उद्देश्य असते.

कधी कधी वाक्यामध्ये एकच उद्देश्य व एकच विधेय असते.

**उदा. :** कोंबडा आरवला.

उद्देश्य - कोंबडा (कोण आरवला)

विधेय – आरवला

२) विधेय : उद्देश्याविषयी जे सांगितले जाते त्यास विधेय असे म्हणतात. विधेय म्हणजे क्रियापद व क्रियापदाला सहाय्य करणारे शब्द विधेयामध्ये येतात.

उद्देश्य सोडून उरलेला वाक्याचा भाग विधेय असते. क्रियापद नेहमी विधेय भागात येते.

**उदा. :** कोंबडा आरवला.

उद्देश्य – कोंबडा विधेय– आरवला

★ उद्देश्य विस्तार :

वाक्यामध्ये उद्देश्य हे एकापेक्षा जास्त शब्दांत येऊ शकतात.

**उदा. :** सशाचे कान लांब असतात.

उद्देश्य मिळवण्यासाठी क्रियापदाला कोण व कोणी हा प्रश्न विचारले असता उत्तर मिळते.

जसे कान कोणाचे लांब असतात. तर सशाचे. म्हणून उद्देश्य – सशाचे कान. विधेय – लांब असतात.

उद्देश्य भाग वाक्याच्यामध्ये किंवा शेवटी येऊ शकतो.

**उदा.** मंदिरात जाऊन आजीने दिवा लावला.

उद्देश्य – आजीने

उद्देश्य भाग हे वाक्याच्या सुरुवातीला ठेवून वाक्य पुन्हा लिहिल्यास अर्थपूर्ण वाक्य तयार होते.

**उदा. :** आजीने मंदिरात जाऊन दिवा लावला.

उद्देश्य – आजीने विधेय – मंदिरात जाऊन दिवा लावला.

**उदा. :** खाल्ला पेरू पोपटाने.

उदाहरणात वाक्यातील शब्द उलट सुलट दिलेली आहेत अशा वेळी शब्द रचना सरळ करावी आणि कोण कोणी हा प्रश्न विचारल्यास उद्देश्य मिळते.

जसे पोपटाने पेरू खाल्ला.

पेरू कोणी खाल्ला.

**उत्तर** – पोपटाने म्हणून उद्देश्य – पोपटाने विधेय – पेरू खाल्ला.

### नमूना प्रश्न

**प्र. वाक्यातील उद्देश्य भाग ओळखा.**

१) वटवाघूळ हा एक निशाचर प्राणी आहे.

(१) प्राणी (२) निशाचर
(३) वटवाघूळ (४) वटवाघूळ हा एक

**स्पष्टीकरण :** वाक्याला कोण व कोणी हे प्रश्न विचारा, जसे कोण निशाचर प्राणी आहे. तर उत्तर येईल वटवाघूळ. म्हणून पर्याय (३) हे बरोबर उत्तर आहे.

२) हळद पिवळ्या रंगाची असते.

(१) हळद (२) पिवळ्या (३) रंगाची (४) असते

**स्पष्टीकरण :** वाक्याला कोण व कोणी असे प्रश्न विचारा, जसे, पिवळ्या रंगाची कोण असते तर हळद म्हणून पर्याय क्रमांक (१) बरोबर आहे.

३) पृथ्वी सूर्याभोवती फिरते.

(१) सूर्य (२) पृथ्वी (३) फिरते (४) भोवती

**स्पष्टीकरण :** वाक्याला कोण व कोणी असे प्रश्न विचारा. जसे सूर्याभोवती कोण फिरते. तर उत्तर पृथ्वी येईल म्हणून पर्याय क्रमांक (२) हे बरोबर उत्तर आहे.

**प्र. वाक्यातील विधेय भाग ओळख.**

१) आईने भाजी करून दिली.

(१) आईने (२) भाजी
(३) भाजी करून दिली (४) आईने भाजी

**स्पष्टीकरण :** वाक्याला कोण व कोणी असे प्रश्न विचारून जे उत्तर येईल ते उद्देश्य असते. म्हणजे कोणी भाजी करून दिली तर उत्तर येईल आईने. पण आपल्याला विधेय विचारले आहे म्हणून उद्देश्य सोडून राहिलेला भाग म्हणजे विधेय आहे.

उद्देश्य – आईने विधेय – भाजी करून दिली म्हणून पर्याय क्रमांक (३) हे बरोबर उत्तर आहे.

४) फार मोठा गायक आहे तो!

(१) फार मोठा (२) गायक आहे
(३) तो (४) फार मोठा गायक आहे

**स्पष्टीकरण :** वरील वाक्य हे उद्गारवाचक आहे आणि वाक्याच्या शेवटी कर्ता आहे. म्हणून वाक्य सरळ करुन घेणे.

**तो फार मोठा गायक आहे.**

आता वाक्याला कोण व कोणी असा प्रश्न विचारा, फार मोठा गायक कोण आहे तर उत्तर तो येईल. पण तो हे उद्देश्य म्हणजे वाक्याचा कर्ता आहे आणि आपल्याला विधेय, विचारलेले आहे. म्हणून पर्याय क्रमांक (४) हे बरोबर उत्तर आहे.

### सराव प्रश्न

**प्र. पुढे दिलेल्या वाक्यांतील उद्देश्य भाग ओळखा व त्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

१] आम्ही जातो आमच्या गावा.

(१) आम्ही जातो (२) जातो
(३) आमच्या गावा (४) आम्ही

२] दिपक अभ्यास करत आहे.

(१) करत आहे (२) दिपक
(३) अभ्यास (४) दिपक अभ्यास

३] शिवरायांनी तोरणा किल्ला जिंकला.

(१) शिवरायांनी (२) तोरणा
(३) किल्ला (४) जिंकला

४] मी पाहिलेला हत्ती खूप मोठा होता.

(१) मी पाहिलेला (२) खूप मोठा होता
(३) मी पाहिलेला हत्ती (४) हत्ती खूप मोठा होता

५] रस्त्यावरून जाताना सुमित धपकन पडला.

(१) सुमित (२) धपकन पडला
(३)रस्त्यावरून जाताना (४) रस्त्यावरून जाताना सुमित

**प्र. पुढे दिलेल्या वाक्यांतील विधेय भाग ओळखा व त्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

१] सचिन क्रिकेट खेळतो.

(१) सचिन क्रिकेट (२) खेळतो
(३) क्रिकेट खेळतो (४) सचिन

२] गरुड पक्ष्यांचा राजा आहे.

(१) राजा (२) पक्ष्यांचा राजा आहे
(३) गरूड (४) गरुड पक्ष्यांचा

३] आज हवेत गारवा आहे.

(१) आज (२) हवेत
(३) गारवा आहे (४) आज हवेत आहे.

४] माझी आई देवासारखी आहे.

(१) माझी आई (२) देवासारखी आहे
(३) आई (४) देवासारखी

५] सूर्य पश्चिमेला मावळतो.

(१) सूर्य (२) पश्चिमेला
(३) सूर्य पश्चिमेला (४) पश्चिमेला मावळतो

**प्र. पुढील वाक्यातील उद्देश्य भागात एकूण किती शब्द आहेत? त्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

१] शाहजहानने बांधलेला ताजमहाल, रात्रीच्या चांदण्यात मोहक दिसतो.

(१) पाच (२) तीन (३) चार (४) सात

२] आस्था आणि अक्षरा एकाच शाळेत शिकतात.

(१) चार (२) तीन (३) दोन (४) एक

**प्र. पुढील वाक्यातील विधेय भागात एकूण किती शब्द आहेत? त्या पर्याय क्रमांकाचे वर्तुळ रंगवा.**

१] राधा गोड गाते.

(१) चार (२) दोन (३) तीन (४) एक

२] रोगामुळे शरीर क्षीण होत जाते.

(१) पाच (२) दोन (३) तीन (४) दोन

शिष्यवृत्ती इयत्ता ८ वी

श्री. किशोर बोरसे

# विषय - बुद्धिमत्ता


## घटक - 1) आकृती ( भारांश - २० % अपेक्षित प्रश्न संख्या - १०)

शिष्यवृत्ती परीक्षेत बुद्धिमत्ता या विषयात आकृती या घटकावर विविध प्रकारचे प्रश्न असतात. आकृती या घटकाचा प्रश्न सोडवताना, आपले निरीक्षण कौशल्य चांगले असणे आवश्यक आहे. आपण काळजीपूर्वक निरीक्षण व विचार केल्यास आकृती या घटकातील तर्क शोधू शकतो. या घटकाचा अभ्यास आपण नमुना प्रश्न समजून सोडवूया. आकृतीवरील साधारणपणे खालीलप्रमाणे प्रश्न येतात.

१) विसंगत आकृती ओळखा २) आरशातील प्रतिमा ३) जल प्रतिमा ४) आकृती पूर्ण करणे ५) दिलेल्या प्रश्नाकृतीत लपलेला भाग पर्यायातून निवडा ६) कागदाला घडी घालून कापला व उघडला व त्याचा आकार ७) प्रश्नाकृती पूर्ण करणे.

प्रत्येक प्रकारच्या आकृतीवरील काही प्रश्न स्पष्टीकरणासह सोडवून दिले आहेत व आपणास सरावासाठी प्रश्न सोडवण्यासाठी दिले आहेत. आपण काळजीपूर्वक निरीक्षण करून स्वाध्याय प्रश्न सोडवण्याचा सराव करावा.

**१) विसंगत/वेगळी आकृती ओळखा.**



१) ○ २) ○ ३) ○ ४) ●

स्पष्टीकरण – पर्याय क्रमांक - ४ वरील आपण सर्व आकृत्यांचे निरीक्षण केल्यास असे दिसते की पहिल्या आकृतीपासून पुढील आकृतीत बदल होत असताना आकृती घड्याळ्याच्या दिशेने ९० अंशात फिरताना दिसते. आकृतीतील सर्व चिन्हांचे निरीक्षण केल्यास असे दिसते कि, पर्याय क्रमांक ४ मध्ये दोन चिन्ह (○ ▭) योग्य पद्धतीने योग्य ठिकाणी नाहीत.


**२) पहिल्या दोन आकृत्यांचा सहसंबंध लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा पर्याय निवडा.**



१) ○ २) ● ३) ○ ४) ○

स्पष्टीकरण – पर्याय क्रमांक - २ स्पष्टीकरण - पहिल्या दोन आकृतींतील सहसंबंध लक्षात घेतला असता, आकृती घड्याळ्याच्या दिशेने ९० अंशात फिरते व आकृतीच्या बाहेर असलेल्या लहान गोलांची संख्या एकाने वाढते. म्हणून तिसऱ्या आकृतीत ३ लहान गोल असून, उत्तराच्या आकृतीत ४ गोल असले पाहिजेत व ९० अंशात आकृती फिरताना दिसेल.


**३) पुढील प्रश्नाकृतीचे जलप्रतिबिंब असणारी आकृती पर्यायांतून निवडा.**



१) ○ २) ○ ३) ● ४) ○


स्पष्टीकरण – जलप्रतिबिंब आकृतीचा विचार करताना आकृतीचा वरचा भाग खाली दिसतो व खाली असणारा भाग वरती दिसतो. मात्र डाव्या व उजव्या बाजूत बदल होत नाही. पर्याय क्रमांक ३ आकृतीचे निरीक्षण केल्यास प्रश्न आकृतीचे जलप्रतिबिंब दिसते.

**प्र. ४ व ५ साठी सूचना : प्रश्नाकृतीची आरशातील प्रतिमा असणारी आकृती पर्यायांतून निवडा.**



१) ● २) ○ ३) ○ ४) ○

स्पष्टीकरण – आरशातील प्रतिमा चे निरीक्षण करताना एक लक्षात घेतले पाहिजे ते म्हणजे डाव्या बाजूला असलेले चिन्ह उजव्या बाजूला चिन्हं दिसतात. चिन्ह, अंक किंवा अक्षरांची डावी बाजू उजव्या बाजूला दिसते व उजवी बाजू डाव्या बाजूला दिसते. मात्र आकृतीचा वरचा भाग वरती व खालचा भाग खाली दिसतो. पर्याय क्रमांक १ या आकृतीत वरील गोष्टी दिसतात.





स्पष्टीकरण – आरशातील प्रतिमा चे निरीक्षण करताना एक लक्षात घेतले पाहिजे ते म्हणजे डाव्या बाजूला असलेले चिन्ह उजव्या बाजूला चिन्हं दिसतात. चिन्ह, अंक किंवा अक्षरांची डावी बाजू उजव्या बाजूला दिसते व उजवी बाजू डाव्या बाजूला दिसते. मात्र आकृतीचा वरचा भाग वरती व खालचा भाग खाली दिसतो. पर्याय क्रमांक २ या आकृतीत वरील गोष्टी दिसतात.

१) ○ २) ● ३) ○ ४) ○

**प्र. ६ व ७ साठी सूचना : दिलेली प्रश्नाकृती पूर्ण करण्यासाठीचा योग्य पर्याय निवडा.**

**६. प्रश्नाकृती उत्तराकृत्या**



१) ○ २) ● ३) ○ ४) ○

स्पष्टीकरण – प्रश्नकृतीचे निरीक्षण केल्यास चौथा भाग पूर्ण करताना आपण डाव्या भागाचे निरीक्षण करून जर पेन्सिल ने ड्रॉईंग केल्यास पर्याय क्रमांक २ आकृती चा भाग तयार होऊ शकतो.

**७ प्रश्नाकृती उत्तराकृत्या**



१) ● २) ○ ३) ○ ४) ○

स्पष्टीकरण – प्रश्नकृतीचे निरीक्षण केल्यास चौथा भाग पूर्ण करताना आपण डाव्या भागाचे निरीक्षण करून जर पेन्सिल ने ड्रॉईंग केल्यास पर्याय क्रमांक १ आकृती चा भाग तयार होऊ शकतो.

**८) प्रश्नाकृतीशी तंतोतंत जुळणारी आकृती पर्यायातून निवडा.**

**प्रश्नाकृती उत्तराकृत्या**




१) ○ २) ● ३) ○ ४) ○

स्पष्टीकरण – प्रश्नाकृतीचे निरीक्षण केल्यास तंतोतत जुळणारी आकृती पर्याय क्रमांक २ योग्य आकृती आहे. या प्रश्नासाठी आपण किती मन एकाग्र करून निरीक्षण करतो हे महत्वाचे आहे.

**९) प्रश्नाकृतीतील कागदाला घडी घालून कापला व उघडला, तर त्याचा आकार कोणत्या पर्याय आकृतीप्रमाणे दिसेल?**

**प्रश्नाकृती उत्तराकृत्या**



१) ○ २) ○ ३) ○ ४) ●

स्पष्टीकरण – प्रश्नाकृतीला घडी घातल्यास व प्रश्नाकृतीनुसार कागद कापला व उघडला तर ज्या पद्धतीने आकार कापत आहोत तसेच आकार आकृतीच्या भागात दिसणे आवश्यक आहे. पर्याय ४ मधील आकृतीचे निरीक्षण केल्यास चार भाग सामान दिसतात.

**१०) दिलेल्या प्रश्नाकृतीत लपलेला भाग पर्यायातून निवडा.**

**प्रश्नाकृती उत्तराकृत्या**



१) ● २) ○ ३) ○ ४) ●

स्पष्टीकरण – प्रश्नाकृतीत लपलेला भाग शोधण्यासाठी उत्तर आकृतीच्या पर्यायांचे निरीक्षण काळजीपूर्वक करणे आवश्यक आहे. उत्तर आकृतीतील कोणता भाग आकृतीत येऊ शकतो याचे निरीक्षण केल्यास, पर्याय क्रमांक १ व पर्याय क्रमांक ४ आकृती आपले उत्तर येईल.

चला आता, काही प्रश्न आपण स्वतः सोडवू या. प्रत्येक आकृतीचे निरीक्षण काळजीपूर्वक करा आणि वरील स्पष्टीकरण लक्षात घेऊन सोडवा. आपले उत्तर कोणत्या लॉजिकच्या आधारावर आहे ते आपल्या शब्दात लिहा. Best Luck!!


### स्वाध्याय चाचणी

**१) विसंगत / वेगळी आकृती ओळखा.**



१) ○ २) ○ ३) ○ ४) ○

**२) पहिल्या दोन आकृत्यांचा सहसंबंध लक्षात घेऊन प्रश्नचिन्हाच्या जागी येणारा पर्याय निवडा.**




१) ○ २) ○ ३) ○ ४) ○

**३) खालील प्रश्नामध्ये दिलेल्या आकृतीची आरशातील प्रतिमा असणारा अचूक पर्याय शोधा.**





१) ○ २) ○ ३) ○ ४) ○

**४) खालील प्रश्नामध्ये दिलेल्या आकृतीची आरशातील प्रतिमा असणारा अचूक पर्याय शोधा.**



१) ○ २) ○ ३) ○ ४) ○

**५) खालील प्रश्नामध्ये दिलेल्या आकृतीचे पाण्यातील प्रतिबिंब असणारा अचूक पर्याय शोधा.**



१) ○ २) ○ ३) ○ ४) ○

• Registered • Date of Publication : शुक्रवार, १९ जानेवारी २०२४ • Posted at BPC Vishrambagwada, CSO Pune Daily. • आर.एन.आय. MAHMAR-१५५७/५७.



# नवा सिक्सर किंग
# Shivam Dube

जन्म - २६ जून १९९३ । मुंबई, महाराष्ट्र । वय - ३० वर्षे

अफगाणिस्तानविरुद्धच्या टी-२० मालिकेत धडाकेबाज खेळी करणारा शिवम दुबे टी- २० विश्वकरंडकाच्या संघामध्ये सहभागी होणार का? यावर आता चर्चा सुरू आहे. अफगाणिस्तानविरुद्धच्या पहिल्या सामन्यात अष्टपैलू शिवमने ४० चेंडुत ६० धावा तर दुसऱ्या सामन्यात ३२ चेंडुत ६३ धावा केल्या. विशेष म्हणजे दोन्ही सामन्यांत तो नाबाद राहिला. दोन्ही सामन्यांत मिळून त्याने एकूण नऊ चौकार तर सहा षटकार मारले. त्यामुळेच जूनमध्ये होणाऱ्या टी-२० विश्वकरंडक स्पर्धेत शिवमची वर्णी लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



आयपीएल सामने ५१

धावा ११०६

बळी ४

झेल १७

## फलंदाजीत वैविध्य

फिरकी गोलंदाजांचे चेंडू सीमापार धाडण्याचं कसब शिवममध्ये आहे. माजी कर्णधार महेंद्रसिंग धोनी याच्या मार्गदर्शनातूनच आपण तयार होत असल्याचं शिवम मान्य करतो. शिवमचे वैशिष्ट्य म्हणजे त्याच्या बॅटमध्ये फटक्यांचे वैविध्य आहे. गोलंदाजाला अंदाज लावता येणार नाही अशी त्याची फटकेबाजी असते, त्यामुळेच त्याला नवा 'सिक्सर किंग' म्हणूनही ओळखले जाऊ लागले आहे.

डावखुरा फलंदाज, मध्यम गती उजव्या हाताने गोलंदाजी करणारा गोलंदाज व उत्कृष्ट क्षेत्ररक्षक

टी - २० सामने २०

धावा २७५

बळी ८

झेल ११

| | | | |
|---|---|---|---|
| ५ कोटी | ४.४० कोटी | ४ कोटी | ५.८० कोटी |
| २०१९ / २० | २०२१ / २२ | २०२२ / २३ | २०२४ |
| रॉयल चॅलेंजर्स बंगलोर | राजस्थान रॉयल्स | चेन्नई सुपर किंग्ज | राजस्थान रॉयल्स |

## ५.८० कोटींचा करार

शिवम दुबेची वर्ल्डकपमध्ये वर्णी लागणार का? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले असले तरी गेल्या चार वर्षांतील आयपीएलमधील त्यांची किंमत मात्र घसरताना पाहायला मिळत होती. २०१९ मध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगलोरने शिवमशी ५ कोटींचा करार केला होता. तो २०२१ मध्ये राजस्थान रॉयल्सने ४ कोटी ४० लाखांचा केला आणि २०२२ मध्ये तर हा करार ४ कोटी रुपयांपर्यंत खाली आला. यावर्षी मात्र शिवमने पुन्हा उचल खाल्ली असून २०२४ साठी राजस्थान रॉयल्सने त्याच्यासोबत ५.८० कोटींचा करार केला आहे.

